म. ग्रं. सं. ठाणें

विषय: चरित्र

संग्रहालय क्रमांक

सन

लेखक वामन दाजी ओक

पुस्तकाचें नांव श्री. नानक चरित्र

चरित्र ५० नं.

इ. स. १८८९

म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

सं. नं. ८०

# ह्याचें चरित्र.

वामन दाजी ओक

यांनीं लिहिलें.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणे नोंदलें आहे.

---

सन १८८९.

मुंबईत:

इंडियन प्रिंटिंग छापखान्यांत छापिलें.

किंमत २ आणे.

विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत विकत मिळेल.

स्रागु पुनि मा [illegible]

जोहू पीड स्थि [illegible]

पुंक आई धीगारि [illegible]

सरोग [illegible]

# बाबा नानक.

शिजल्यातें भक्षुनियां,
मग उगळी जो सजीव मीनातें ।
त्या नानक सिद्धांसीं,
लाविन गुरुबंधु हेंचि मी नातें ॥
मोरोपंत—'सन्मणिमाला.'

मराठी भाषेंत चरित्रलेखनाचा प्रकार अलीकडील असून जितका असावा तितका अद्याप आढळत नाहीं. [illegible]क्की अर्थी सत्यासत्याचा विचार करून स्वतंत्र ग्रंथरचना करण्याचा प्रचार पडण्यास पुष्कळ काळ लोटावा लागतो हें खरें आहे. कांहीं वर्षांपूर्वी ही ग्रंथपद्धति आमच्या लोकांस माहित सुद्धां नव्हती. संस्कृत भाषेंत तर शुद्ध चरित्रपर ग्रंथांचा अभावच आढळतो. 'महाभारत' 'रामायण' व पुराणें यांस इतिहासाची योग्यता [illegible]तां येत नाहीं, ह्मणून वरच्यासारखा उल्लेख करण्यास [illegible]ारसा बाध नाहीं. एकंदर राष्ट्राचा इतिहास बुडून गे[illegible]यासारखा झाल्यामुळें राष्ट्राचे प्रतिनिधीभूत मानिलेल्या [illegible]हाजनांचें चरित्र अर्थातच नष्ट होऊन गेलें. संस्कृतांत 'राजतरंगिणी' 'विक्रमांकदेवचरित', 'शंकरविजय', 'हर्षचरित्र', 'ललितविस्तर', 'भोजप्रबंध', 'इत्यादि [illegible]तिहासपर आणि चरित्रपर ग्रंथ आहेत खरे, तथापि [illegible] इतिहासाचे कसास लावून पाहिलें असतां पुष्कळ [illegible]ंशीं फिक्के पडतील. त्यांतील अद्भुत आणि मासादिक

गोष्टींस इतिहासाची मातब्बरी देतां येत नाहीं. प्राकृतांत महिपतीनें ' भक्तिविजय ', ' संतविजय ' व ' भक्तलीलामृत ' या ग्रंथांत भगवद्भक्तांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. परंतु त्यांची योग्यता इतिहाससंबंधानें वरील ग्रंथांहून कांहीं जास्त आहे असें दिसत नाहीं. एतावता जुने निवळ इतिहासपर आणि चरित्रपर ग्रंथ नाहींत असें झालें. प्लुटार्क, कॉर्नेलियस् नीपॉस्, जॉन्सन्, इत्यादि चरित्रकार जसे परद्वीपस्थ लोकांत होऊन गेले, तसा प्रकार हिकडे झाल्याचा बहुधा मागमूस नाहीं. आतां असा प्रकार कोणत्या कारणानें घडून आला असा कोणीं प्रश्न केल्यास त्यास उत्तर इतकेंच-कीं, त्या वेळची स्थिति मनांत आणिली असतां तो काळ चरित्रलेखनास अनुकूळ नव्हता, व गद्यग्रंथ लिहिण्याची पद्धति फारशी प्रचारांत आली नव्हती.

या देशांत इंग्लिशांचें राज्य स्थापित झाल्या दिवसापासून व इंग्लिश विद्येचा संस्कार झाल्यानें, पाश्चात्य विद्यावैभवाचीं भिन्न स्वरूपें दृग्गोचर होत गेलीं. त्या वेळच्या अग्रेसर विद्वज्जनमंडलानें परक्या भाषेचें ज्ञान संपादन करून, स्वसामर्थ्यानुरोधानें मराठी भाषेंत नवीन ग्रंथरचना करण्याचे आवडीनें, चरित्रलेखनास आरंभ केला. त्या वेळीं पाश्चात्य विद्येवर भर असे, दूरद्वीपस्थ लोकांच्या ज्ञानांजनशलाकेनें आमच्या लोकांचे नेत्र साफ केले व कित्येक नवीनगोष्टीही शिकविल्या. विद्यालयसंपादित नूतन ज्ञानाचा यथार्थ उपयोग करावा म्हणून त्या काळच्या विद्वानांनीं मोठ्या हौसेनें कंबर बांधिली. आणि तिकडील विख्यात पुरुषांचा वृत्तांत

लिहून ठेविला. त्या वेळेस 'कोलंबस,' 'कपतान कुक,' 'खुसरू' इत्यादिकांचीं चरित्रें भाषांतररूपानें मराठी भाषेंत प्रसिद्ध झालीं. हीं बहुधा दुर्मिळ असून छापून प्रसिद्ध झाल्याची वार्ता सुद्धां आज कित्येकांस माहित नसेल. इंग्लिश भाषेच्या व्यासंगानें ग्रंथरचनेची स्फूर्ति होऊन मराठी भाषेस गद्यात्मक लेखनपद्धतीचें स्वरूप मिळालें तें वरील पुस्तकांत चांगलें झळकत आहे. याप्रमाणें चरित्रलेखनाचा प्रचार पडतो आहे नाहीं तोंच बंद झाला. मध्यंतरीं कांहीं वर्षें सुनींच गेलीं. अलिकडे 'दक्षिणा प्राईझ् कमिटी' च्या आश्रयानें 'बेन्जामिन् फ्रांकलिन्', 'जार्ज वाशिंग्टन्' व 'लॉर्ड क्लाइव' यांचीं चरित्रें छापलीं गेलीं. याशिवाय अगदीं अलिकडे रा. रा. विनायक कोंडदेव ओक यांनीं केलेलीं 'शिकंदर् बादशाहा,' 'पिटर धी ग्रेट्', 'ड्यूक् आफ् वेलिंग्टन्' यांचीं चरित्रें विद्याखात्याचे मुख्य अधिकारी यांच्या आश्रयानें प्रसिद्धीस आलीं आहेत. हीं सर्व पुस्तकें संग्रहणीय आहेत. पहिल्या विद्वानांच्या आणि अलिकडील विद्वानांच्या भाषेमध्यें फार तफावत दिसून येईल. याशिवाय आणखीं दोन तीन ग्रंथ खेरीज करून कांहीं विशेष झाल्याचें फारसें आढळांत नाहीं.

आमच्या देशांत ईशदयेनें राजकारस्थानी, धार्मिक, तत्त्वज्ञ, अध्यात्मवेत्ते, गणिती, शौर्यशाली, विद्वान्, असे अनेक थोर पुरुष होऊन गेले त्यांच्या लोकोत्तर गुणांचा पोवाडा गाण्यास पाहिजे तेवढीं साधनें असतीं तर एक लहानसें भारतच झालें असतें. परंतु दुर्दैवानें तीं साधनें प्राप्त होण्याची आशा आज किती आहे हें न-

ग्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. ज्यांपाशीं अशीं साधनें आहेत ह्मणून ऐकितों त्यांस तीं दाखविण्याची अथवा प्रसिद्ध करण्याची वासना होत नाहीं. फार काय पण कीड लागून त्यांचा नाश झाला तर तोही त्यांस पतकरतो. परंतु असें कागदपत्र पेटींतून बाहेर ह्मणून काढावयाचे नाहींत. अशा सत्पुरुषांस रामदास कोणत्या कोटींत गणतात हें स्पष्ट आहे.–

आपण वाचीना कधीं । कोणास वाचावया नेदी ॥
पुस्तक बांधोनी ठेवी बंदीं । तो एक मूर्ख ॥ १४ ॥
दासबोध.

आतां सुदैवानें जीं साधनें मिळण्याचा संभव आहे त्यांपासून संपूर्ण महाराष्ट्र देशांतील महाजनांचें चरित्र लिहिण्यास फारशी मदत होणें नाहीं. सांगण्याचें इतकेंच कीं, या अभावामुळें थोर पुरुष आमच्या देशांत निपजले असून परकी राष्ट्रांतील पुरुषांकडे आह्मांस पहावें लागतें. ह्मणूनच परदेशांतील थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचें इकडील ग्रंथकारांनीं पतकरिलें यांत त्यांणीं कांहीं वावगें केलें असें नाहीं. ' आमच्या राष्ट्रांत जे अनेक थोर थोर प्रतापी पुरुष होऊन गेले आहेत त्यांचें यथार्थ वर्णन करण्यास आह्मांस अखंड जागा असून युरोपांतील किंवा अमेरिकेंतील राष्ट्रांकडे पहाण्याची जरूरी नाहीं' हें मत कित्येकांस प्रशस्त दिसत नाहीं. ह्मणजे हें उदार बुद्धीचें लक्षण नव्हे असें त्यांचें ह्मणणें आहे. खरें ह्मटलें तर अनेक देशांच्या इतिहासाच्या अवलोकनानें मन जसें विकसित शांत प्रसन्न आणि प्रशस्त होतें तसें आपल्या देशाच्या इतिहासापासून ह्मणजे मुख्य विषयां

च्या लहानशा भागापासून सर्वांशीं होईल असें वाटत नाहीं. " मनुष्य हाच मनुष्याला विचार करावयाला उत्तम विषय होय" असें एका मार्मिक व जगन्मान्य इंग्लिश *कवीचें वचन आहे. इतिहासापासून अथवा चरित्रापासून होणारा मुख्य *लाभ ह्मटला तर मानवस्वभावाचें ज्ञान, मग तो मनुष्य कोठीलही असो*, परदेशांतील अथवा स्वदेशांतील असला तरी या विषयसंबंधानें त्याचे महत्त्वांत न्यूनाधिक्य होत नाहीं. ह्मणून युरोपांतील किंवा अमेरिकेंतील प्रतापी पुरुषाचें कोणीं चरित्र लिहिल्यास अथवा पाहिल्यास त्यास नाकें मुरडणें हा प्रकार समंजसतेस आणि सदभिरुचीस अनुसरून आहे असें ह्मणतां येत नाहीं. मनुष्याच्या ठायीं जिज्ञासा ह्मणजे अनेक गोष्टी समजून घेण्याची उत्कंठा आहे. तिचें समाधान इतिहासाध्ययनद्वारा होणारें आहे. युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया या देशांतील स्थिति कोणत्या प्रकारची आहे, कोणत्या प्रकारच्या गोष्टींत त्या लोकांचें पाऊल पुढें आहे, अमेरिकेंतील लोक अडाणी कां राहिले, इत्यादि गोष्टी समजून घेण्यास जिज्ञासावृत्ति सारखी धांव घेत असत्ये.' हें जर खरें आहे तर युरोपांतील किंवा अमेरिकेंतील राष्ट्रांकडे पहाण्याची जरूरी आहे किंवा नाहीं याचा निर्णय तेव्हांच होतो. दुसरें ज्यांस आपल्या घराबाहेर जरा कांहीं आहेसें वाटत नाहीं अथवा पूर्णपणें माहित असून तिकडे पहाण्याची इच्छा

---

* "Know then thyself, presume not God to scan.
The proper study of mankind is man.

Pope—'Essay on Man'.

नाहीं त्याचे मनाचें थोरपण केवढें ह्मणून सांगावें! अशांचें वर्णन रामदासांनीं पूर्वीच करून ठेविलें आहे.—

आपण आपली करी स्तुति। स्वदेशीं भोगी विपत्ति॥
सांगे वडिलांची कीर्ति। तो एक मूर्ख॥ ४९॥

दासबोध.

इतिहासापासून होणारे फायदे साधारणतः आमच्या वाचकांस अगोदरच माहित आहेत ह्मणून त्यांजविषयीं आज विशेष विवेचन करीत नाहीं. इतिहासावलोकनानें कल्पनाशक्ति, विचारशक्ति, स्मृति इत्यादि मानसिक शक्ति प्रगल्भ दशेस पावतात, भ्रांतिमूलक मतांचें निरसन होतें. सत्याची योग्यता समजत्ये. लोकव्यवहारांत साहाय्य होतें, हें सर्वांस माहितच आहे. प्रख्यात कार्लाइल साहेब यांणीं एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, जगाचा इतिहास ह्मणजे जगांतील थोरपुरुषांच्या चरित्रांचा संग्रह होय. चरित्रवाचनापासून इतिहासाचें ज्ञान चांगलें होतें. कारण थोरपुरुषांचीं चरित्रें हा इतिहासाचा मुख्य भाग होय. महान् महान् सज्जनांचीं चरित्रें उपदेशपर आणि हितावह असतात. तीं आपल्यास सद्वर्तनाचा कित्ता घालून देतात व त्यांजसारखें आचरण करावें अशी प्रेरणा करतात. त्यांचें बोलणें एक आणि करणें एक असें कधींही होत नाहीं.— यथा चित्तं तथा वाचो यथा वाचस्तथा क्रियाः। चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता॥ हें खऱ्या महाजनांचें लक्षण त्यांच्या चरित्रांत आढळतें व त्यांचें आपण अनुकरण करावें अशी मनाची प्रवृत्ति होत्ये. अशा सद्विभूतींचीं चरित्रें वाचून अंतःकरणावर नीतीचा, सत्याचा आणि सद्भास-

नांचा ठसा उमटतो. कुवासनेचें मूळ खुंटतें. तुकारामानें एका ठिकाणीं ह्मटलें आहे:—

> आपणासारिखें करिती तात्काळ ।
> नाहीं काळ वेळ मग त्यांसीं ॥ १ ॥
> लोहपरिसाची न साहे उपमा ।
> सद्गुरुमाहिमा अगाधची ॥ २ ॥

असा थोर पुरुषांचा अगाध महिमा आहे. तेव्हां अशा एखाद्या पुरुषाचें चरित्र संक्षेपतः लिहिलें असतां पुष्कळांस आवडेल.

विख्यात पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचा आमचा मूळ संकल्प असून तसे विषय वारंवार आले नाहींत हें खरें आहे. याचें कारण अशीं चरित्रें लिहिलींच तर सविस्तर लिहिलीं पाहिजेत. नेमक्या पृष्ठांत लिहिल्यानें जेवढा उपयोग व्हावा तेवढा होत नाहीं. पुन्हा पांच सहा अंक एकाद्या पुरुषाच्या चरित्रानें भरून काढून मग वाचकांची माफी मागणें अथवा तसें करण्याचीं कारणें सांगत बसणें हें प्रशंसनीय नव्हे असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. सविस्तर जीवनवृत्तांत लिहिणें हें काम स्वतंत्र ग्रंथकाराचें होय. मासिक पुस्तकांत विस्तारपूर्वक चरित्र लिहिलें असतां—विषयाची सामग्री खुंटल्यामुळें आह्मी कांहींतरी मजकूर वाचकांवर लादून देत आहों असाही कोणास अंदेशा येऊन चुकला असेल—अशा प्रकारचा मजकूर लिहिण्याचा प्रसंग येतो. ह्मणून सविस्तर चरित्र लिहिण्याच्या भरिस त्यांनीं बहुधा पडूं नये. वाचकांस असल्या विषयाची गोडी लागावी इतकाच उद्योग त्यांनीं करावा. हेंच त्यांस योग्य. आमचे महाराष्ट्र

कविशिरोमणि मोरोपंत यांणीं सन्मणिमालेंत ज्याचें नांव आनंदानें गुंफिलें आहे त्या बाबा नानकाचा संक्षिप्त वृत्तांत सादर करितों. पुढील वृत्तांत एकाद्या ग्रन्थाच्या आधारानें लिहिला आहे असें नाहीं. अनेक ठिकाणची माहिती गोळा करून पुढील चरित्रांत तिचा समावेश केला आहे.

आमच्या हिंदुस्थानांत अनेक धर्म, विविध पंथ, आणि असंख्य मतें पसरलीं आहेत. ज्याला त्याला आपला धर्म जीवप्राण वाटतो. कोणताही धर्म पाहिला तरी धर्माचा प्राण ह्मटला तर विश्वास, आणि ईश्वरास्तित्व होय. धर्माचा हेतु सुख, मग तें पारलौकिक असो अथवा ऐहिक असो. स्वधर्माचरण करून शेवटीं मिळवावयाचें काय? तर सुख. सुखप्राप्ति हा सर्व धर्मांचा उद्देश. हिंदुधर्म पहा, मुसलमानधर्म पहा, परधर्मोपहासपटु ईश्वरपुत्र सेवकांचा धर्म पहा, सर्वांत सुखप्राप्तीची लालुच आहे. निरपेक्ष निरिच्छ असें ह्मणून कांहीं नाहीं. विश्वासाचे पायावर सर्व धर्मांची इमारत उठविली आहे. लोकव्यवहारांत साधारणतः विश्वासाचें जसें प्राधान्य आहे तसेंच धर्मव्यवहारांतही आहे. जेथें विश्वास नाहीं, तेथें धर्म नाहीं, अधर्म नाहीं, पाप नाहीं, पुण्य नाहीं आणि कांहीं नाहीं. सर्वच शून्यवत् होय. धर्माचा ओघ पारलौकिक सुखप्राप्तिकडे जसा आहे तसा ऐहिक सुखाकडे आहे. धर्मान्तराच्या संबन्धानें वेळोवेळीं मनुष्यांचे सुखांत जितक्या घडामोडी होत असतील तितक्या दुसऱ्या कोणत्याही योगानें होत नाहींत. धर्म आणि लोकस्थिति यांचा परस्पर निकट संबंध आहे. जसा धर्म

असतो तसा लोकस्थितीचा प्रकारही असतो. आमच्या लोकांच्या धर्माचा व्यवहाराशीं इतका संबंध आहे कीं, आमचें एक पाऊलसुद्धां धर्मसंबंधाशिवाय पडत नाहीं. उठतां बसतां, जातां येतां, देतां घेतां आमच्या धर्माचें प्रकरण आहेच. धर्म आणि लोकव्यवहार ह्यांची विसंगत होत नाहीं. एक एकामागून असावयाचा. ह्या जगतीतलावरील महान् महान् राज्यक्रान्तींस आणि उलथापालथींस सबळ कारण ह्मटलें ह्मणजे धर्म होय. युरोपखंडाचें स्थित्यन्तरास कारणभूत काय झालें? रोमन् क्याथोलिक धर्मांतील वेडेवेड्या समजुती, पोपाचें प्राबल्य, तो ह्मणेल तो कायदा, आणि करील तो न्याय, त्याच्या आज्ञेविरुद्ध कोणी उच्चारिल्यास त्यास बहिष्कार, पोपाचे हातून कधीं चुकी घडत नाहीं असा लोकग्रह, त्याचा शब्द "बाबावाक्यं प्रमाणम्," त्याचें प्रमादराहित्य, अशीं आणि अशा प्रकारचीं थोतांडें लोकांस ज्या वेळेस समजूं लागलीं, आणि पोपाचा अधिकार कसपटासमान ज्या वेळेपासून लोक मानूं लागले, त्या वेळेपासून युरोपखंडाच्या स्थित्यन्तरास आणि तदनुषंगानें वैभवास प्रारंभ झाला. खऱ्या स्वधर्माभिमानाच्या प्रेरणेनें जीं मोठमोठीं कृत्यें झालीं आहेत तीं असंख्य सेनाबळानें होण्यास दुष्कर आहेत, किंबहुना व्हावयाचींही नाहींत. नुसत्या शरीरबलानें काय हें जगड्व्याळ विश्व चाललें आहे? हें जर केवळ शरीरबलानुरोधानें चालतें, तर त्याचीच कायती मातब्बरी असती, पण तसें निखालस नाहीं. लोकव्यवहारांत शरीरसामर्थ्याचें कर्तृत्व नाहीं असें नाहीं, पण मुख्य चालक ह्मटलें तर ज्ञान, नीति, सद्धर्म

सदाचार इत्यादिक आहेत. त्यांचेंच काय तें माहात्म्य. स्वधर्माभिमान आणि स्वदेशाभिमान ह्यांच्या उच्चालक आवेशानें स्फुरण पावून हजारों लोकांनीं आपले प्राण खर्च केले आहेत. " हा आमचा धर्म, हाच खरा मुक्तिदायक मार्ग " असें डोक्यांत पिसें शिरलें ह्मणजे त्या मनुष्यास आणिबाणीच्या प्रसंगीं जो आवेश सुटतो व जें वीरश्रीचें स्फुरण चढतें, तें विलक्षण आहे. स्वधर्मरक्षणेच्छा ही फार प्रबल आहे, तिच्या पुढें दुसऱ्या इच्छा तुच्छवत् वाटतात. पहा, ज्या वेळेस मुसलमानी राज्याचा आमच्या देशांत कळस होऊन गेला, त्या वेळेस, मोठमोठ्या बलाढ्य बादशहांनीं हिंदुलोकांस बाटवून मुसलमान करण्याविषयीं अनेक तऱ्हेच्या हिकमती लढविल्या आणि छक्केपंजे करून युक्तिप्रयुक्तींनें त्यांस स्वधर्मी करण्याचें मनावर घेतलें. मानेवर तरवार ठेवून पाहिली, मोठमोठ्या इनामाची आशा दाखविली, राज्यांतील वजनदारींचीं आणि भरंशाचीं कामें देऊं, मोठमोठा अधिकार देऊं, अशीं विश्वसनीय अभिवचनें दिलीं. धर्मांतर केल्यावर बादशाही घराण्यांतील रूपवती युवतींशीं विवाह करून देऊं, अशा हजारों युक्ति बाटविण्यासाठीं लढविल्या तरी स्वसंतोषानें आणि खुषीनें असा कोणीएक तरी हिंदु मुसलमान झाला असेल काय? राज्यमदानें आणि धनमदानें उन्मत्त होऊन ज्या वेळेस मुसलमान लोक हिंदुच्या जिवावर उठले त्या वेळेस जो कहर कोसळला, त्याचें बीज स्वधर्मासक्ति नव्हे काय? यवन लोकाचें प्राबल्य होऊन आपल्या वैभवाच्या ताऱ्यामध्यें ते मोराप्रमाणें नाचत असतां त्यांचा

समाचार घेण्यास, अडाणी मावळे लोकांचें सैन्य घेऊन शौर्यश्रीनें प्रोत्साहित होत्साता राजा शिवाजी जिकडे तिकडे कमर बांधून टक्कर देण्यास सिद्ध असे. याचें मुख्य कारण त्या साध्याभोळ्या लोकांचा स्वधर्माभिमान नव्हे काय? इतकें लांब कशास जा. परवां सत्तावनमध्यें जें एक प्रचंड एकाएकीं बंडरूपी वावदळ उद्भवलें; त्याचें तरी मूळ स्वधर्माभिमानच नव्हे काय? इतिहासावरून असें स्पष्ट होतें कीं स्वधर्माभिमान हा स्वदेशोन्नतीस कारण होतो. स्वधर्मास कोणी ढक्का लाविला तर तो आपल्या जिवास धक्का बसला असें स्वधर्मनिष्ठ समजतात. अशाच समजुतीनें शीक लोक आणि दिल्लीचे बादशहा व इतर मुसलमान राजे यांचीं जीं प्रचंड युद्धें झालीं त्यांस मुख्य कारण ह्मटलें तर धर्माभिमान होय. नानकाच्या व गुरु गोविंदाच्या धर्ममताचा प्रसार होऊन जिकडे तिकडे त्यांच्या शिष्यांचें प्राबल्य झालें. तें त्या वेळेस सहन न होऊन गुरुगोविंदावर आणि त्याच्या शिष्यांवर अतिशय संतप्त होऊन कोपाच्या आवेशानें धर्मनिष्ठ लोकांनीं तरवार उपसली. आणि आपल्या धर्माचें संरक्षण करण्याकरितां आपली मान पुढें केली, ह्याचें तरी बीज धर्माभिमान नव्हे काय? यावरून धर्माभिमानाचा संबंध मोठा जबरदस्त आहे. त्याचें वारें आंगांत भरलें ह्मणजे मन बिथरून जाऊन अगदीं चवताळून जातें. शीक धर्माचीही कांहीं अशीच स्थिति आहे. त्यांचें धर्मशिक्षण आणि धर्मदीक्षा हीं त्यांच्या वैभवास आणि वर्चस्वास बरींच कारणीभूत झालीं आहेत. याच लोकांमध्यें महाराज रणजितशिंग या नांवाचा परा-

क्रमशाली वीर पुरुष उदयास आला. यास त्याच्या प्रतिपक्ष्यांनीं ‘ लाहोरचा सिंह ’ असें नांव दिलें होतें. असो, आतां येथें शीक लोकांचा आद्य धर्मसंस्थापक जो नानक त्याच्या चरित्रास आरंभ करूं. शीक लोकांचा इतिहास अद्याप कोणीं लिहिला नाहीं. तो यापुढें सुदैवानें कोणीं लिहिण्याचें हातीं घेतल्यास आमच्या ह्या चिमकुल्या चरित्राचा कांहीं उपयोग होईल आणि प्रस्तुत चरित्रनायकासही योग्य स्थल मिळेल अशी आह्मी आशा करितों.

शीक लोकांचा आद्यधर्मोत्पादक नानक होय. यास मुसलमानलोक ‘ नानकशहा ’ असें ह्मणतात. आमचे लोकांत ‘ गुरुनानक, ’ ‘ बाबानानक ’ ‘ नानानिरंकार ’ असें ह्मणण्याचा प्रघात आहे. नानकापासून दीक्षा घेऊन त्याचे शिष्य झाले, त्यांस ‘ शीक ’ अशी संज्ञा आहे. ‘ शिष्य ’ या संस्कृत शब्दाचा पंजाबी भाषेमध्यें अपभ्रंश होऊन ‘ शीक ’ हा शब्द उत्पन्न झाला असावा असें दिसतें. लाहोर प्रांतामध्यें भट्टी तालुक्यांत तळवंडी गांवीं इ० स० १४६९ ह्मणजे संवत् १५२६ या वर्षी नानक याचें जन्म जाहलें. हा गांव बीया नदीच्या कांठीं आहे. व त्यास रायपूर असेंही ह्मणतात. कित्येक ग्रंथकारांचें असें मत आहे कीं, नानक याचा जन्म लाहोरापासून सुमारें पंधरा मैलांवर कनकाश नांवाचा गांव आहे तेथें त्याच्या आजोळीं झाला, हें ह्मणणें कांहीसें संभवनीय दिसतें. कारण पंजाबामध्यें पहिल्या बाळंतपणाच्या वेळीं बायकांनीं आपल्या आईबापांच्या घरीं जावें अशी चाल आहे.

माहेरघरीं गेलें असतां तेथें विशेष परिचयाचीं व लहानपणच्या सलगीचीं माणसें पुष्कळ असतात त्यांपासून सासरच्या माणसांपेक्षां जास्त सुख होणार आहे हें स्पष्ट आहे. कांहीं असो, नानक याची जन्मभूमि अमुकच गांव आहे असें खातरीनें सांगतां येत नाहीं. परंतु इतकें मात्र ह्मणतां येईल कीं, त्याचा जन्मदेश पंजाब होय कांहीं शीक ग्रंथकारांनीं तो आषाढ महिन्यांत जन्मला असें लिहून ठेविलें आहे, व कांहीं ह्मणतात कीं, तो कार्तिकामध्यें जन्मला. सारांश, नानकाचे जन्मग्रामाविषयीं आणि जन्ममासाविषयीं ग्रंथकारांचा मतभेद आहे. त्याचा निर्णय करण्यास जोंपर्यंत सबळ व विश्वासार्ह साधनें उपलब्ध नाहींत तोंपर्यंत हा विषय वादग्रस्तच रहावयाचा. असो. या ठिकाणीं एक लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, अमुक अमुक नामांकित पुरुष आमचे गांवीं जन्मास आला त्याचे आह्मी वंशज, आप्त अथवा ग्रामस्थ आहों असें ह्मणणें व त्याविषयीं गर्व वाहणें हें मनुष्यजातीस प्रिय आहे. ज्यानें आपल्या अनुपम काव्यानें जगास मोहित करून सोडलें, तो ग्रीक लोकांचा आद्य कवि होमर याच्या जन्मभूमीविषयीं असाच वाद आहे. ज्यानें आपल्या अप्रतिम वाक्चातुर्यानें आणि समयोचित कोटिक्रमानें अकांडतांडव करून बौद्धधर्माचा उच्छेद केला त्या श्रीमत् शंकराचार्यांच्या जन्मभूमीविषयीं असाच संशय आहे. पण ते आमच्या गांवीं असें ह्मणणारे मात्र पुष्कळ आहेत. यावरून मनुष्याला आपणास मोठें ह्मणवून घेण्याची इच्छा स्वाभाविक आहे असें होतें. ही इच्छा

धरणें सोपें आहे, परंतु पराक्रमाचीं कृत्यें करून आपणांस लोकांकडून मोठें ह्मणविणें हें फार कठीण आहे. असो, फार काय, ज्याची कीर्ति आज हजार दीड हजार वर्षें दिगंतरीं अव्याहत गाजत आहे, ज्याचें नांव आबालवृद्धांच्या तोंडीं झालें आहे, जो रसिक जनांच्या आदरास व प्रेमास सर्वथैव पात्र आहे, ज्याच्या कृति पाहून परद्वीपस्थ विद्वान् आनंदभरांत प्रत्यक्ष देहभानही विसरून गेले, कित्येकांनीं तर सर्व गर्व सोडून ज्याच्या स्तुतीचे पवाडे सप्रेम आणि सोल्लास अंतःकरणानें गाइले, असा जो कालिदास तो केव्हां व कोठें जन्मला याविषयीं निश्चयात्मक गोष्ट कोणचीच कळत नाहीं; तथापि तो अमक्या अमक्या ठिकाणीं झाला असें तत्तत्स्थ लोक भूषण समजून ह्मणतात यांत नवल नाहीं. असो, हा संशयात्मकतेचा प्रकार आमच्या देशांतील गुणिजनांस मात्र लागू आहे असें नाहीं. स्वदेशाचा इत्थंभूत इतिहास लिहून ठेवण्याविषयीं आजकाल ज्यांची अत्यंत प्रसिद्धि आहे त्या लोकांत सर्वांशीं आदरस्थान व परम शोभादायक व भूषणभूत कविवर्य शेक्सपियर यांच्याही जन्मभूमीची अशीच ओढाताण आहे.

नानकाचीं आईबापें गरीब अवस्थेंत होतीं तरी त्यांची रीतभात संभावित आणि अब्रूदार कुळांतील मनुष्यांसारखी होती. याचे बापाचें नांव काळू. हा जातीचा क्षत्रिय असून त्यास काळूवेदी ह्मणत. काळूच्या बापाचें नांव शिवराम होतें व आईचें नांव वार्णशी होतें. यास लालू या नांवाचा एक भाऊ होता. त्याला नानक आणि नानकी अशीं आवडतीं दोन अपत्यें

होतीं. हेंच कायतें त्याचें सारें कुटुंब. त्यानें आपल्या आवडत्या मुलीचा विवाह जयराम नामक एका गृहस्थाशीं लाविला. त्यास बाबर बादशहाचा नातलग दौलतखान लोधी ह्मणून एक गृहस्थ होता त्याजकडे चाकरी होती. तो सुलतानपुर येथें धान्यक्रयविक्रय करून आपली उपजीविका चालवीत असे. क्षत्रिय जातीच्या नियमाप्रमाणें नानक वयांत आल्यावर त्याचें लग्न एका नामांकित कुळांतील मैला नामक गृहस्थाच्या कन्येशीं झालें. त्याचे बायकोचें नांव काय होतें हें कोठें बरोबर आढळत नाहीं. परंतु तिचें नांव सोलरनी होतें, असा एके ठिकाणीं लेख आहे. त्यास दोन मुलगे झाले, त्यांत एकाचें नांव श्रीचंद आणि दुसऱ्याचें नांव लक्ष्मीदास. श्रीचंद यास "संसार मायाजाल आहे व विषयसुख हें अशाश्वत आहे" असें वाटत असे ह्मणून त्यानें प्रपंचपरित्याग केला होता. त्याला एक मुलगा होता त्याचें नांव धर्मचंद होतें. हा शीक लोकांमध्यें "उदासी" ह्मणून जो एक पंथ आहे त्याचा मूलोत्पादक होय. पंजाबभर या पंथाच्या अनुयायी लोकांची वसति आहे. हे बहुधा मठांत राहतात. याचे वंशजांस अद्यापि 'नानकपुत्र' असें ह्मणतात. लक्ष्मीदास याचा स्वभाव त्याचे भावासारखा नव्हता. तो चैनी, विलासी, इष्किबाज आणि रंगेल असा असे. त्यास मूलबाळ कांहीं नव्हतें व त्याची लोकांमध्यें फारशी प्रसिद्धिही नाहीं. याशिवाय नानकास दुसरें मूलबाळ नव्हतें आपल्या वंशजांनीं लहानपणीं कन्या मारण्याची दुष्ट चाल सोडून द्यावी व असें करण्यास कोणालाही अधिकार नाहीं ह्मणून

त्यानें सर्वांस ताकीद केली होती. आपल्या पाठीमागें आपले वंशज चांगल्या रीतीनें वागणार नाहींत असें त्यास वाटून विवाहच करूं नये अशी त्याची इच्छा होती, परंतु बापाच्या पुढें त्याचें चालेना, तेव्हां लग्न करणें भाग पडलें. मुशाफरी करीत असतां आपल्याबरोबर आपल्या मुलांपैकीं कोणासही नेलें नाहीं. तसेंच धर्मगुरु होण्यास त्यांच्यांपैकीं कोणीही योग्य नव्हता म्हणून आपल्या शिष्यशाखेपैकीं एकाची त्या ठिकाणीं योजना केली. नानक व त्याचा बाप काळू हे उभयतां धान्याचा व्यापार करून आपला उदरनिर्वाह करीत.असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. याप्रमाणें नानकाचे पूर्वजांची व इतर आप्तांची हकीकत आहे.

होणाऱ्या मुलाचीं लक्षणें गर्भवती स्त्रियांच्या दोहदावरून समजतात असा प्राचीनकाळचे लोकांमध्यें समज होता. गर्भारपणाच्या वेळच्या नानाप्रकारच्या चमत्कारिक गोष्टी काव्यादि जुनाट ग्रंथांतून वर्णिलेल्या आढळतात, हें पुष्कळांस माहीत असेल. (रघुवंश सर्ग २ पहा). गर्भार बायकांस ज्या पदार्थांच्या इच्छा होतात त्यांस अनुलक्षून अमुक पदार्थ सेवन केला असतां अमुक होईल असे कल्पक पुरुषांनीं नियमही बसविले आहेत. तोच प्रकार नानकासही लागू आहे.तो लहानपणापासून निर्मलांतःकरण आणि सत्त्वशील असा निपजेल असा तर्क त्याच्या आईच्या दोहदावरून चतुरपुरुषांनीं बांधला होता. स्वभाव धार्मिक आणि मन विचारशील, हीं दोन स्तुत्य लक्षणें त्याचे ठिकाणीं बाळपणींच दिसून आलीं. कित्येक ग्रीक ग्रंथकारांनी

असा अभिप्राय आहे कीं, नानकास बाळपणांतच ईश्वर-भक्तीची गोडी लागली होती. नानकाच्या बाळपणाविषयीं अनेक चमत्कारिक गोष्टी ग्रंथांतरीं आढळतात. याच्या आईच्या प्रसूतिसमयीं एक सुईण जवळ होती. तिनें असें सांगितलें कीं, एकाद्या मोठ्या गृहस्थाचे आगमनाचे वेळीं त्याचे आगतस्वागत करण्यासाठीं जसे हजारों लोक आनंदानें जयघोष करीत सामोरे जातात त्याप्रमाणें नानकाचा अवतार झाला तेव्हां जयध्वनींचा गजर ऐकूं आला. ज्या ठिकाणीं ही गोष्ट घडली त्याचें स्मरण रहावें ह्मणून तेथें एक देवालय बांधलेलें आहे. जे मुशाफर नानकाची जन्मभूमि पाहण्याचे उद्देशानें जातात त्यांस तेथचे लोक तें दाखवितात. यास "नानकाना' असें नांव आहे. एका मोठ्या तलावाच्या तीरावर नानक आपल्या बाळमित्रांसह खेळत असे, त्या बाळक्रीडास्थानास" बाळक्रीड" असें ह्मणतात. याच्या विद्याभ्यासास आरंभ केव्हां झाला हें समजत नाहीं. परंतु हा कांहीं दिवस शाळेंत जात असे. ज्ञानसंपादनाचा व शिक्षणाचा मार्ग उत्तम ह्मटला तर शाला होय. त्यांचा जसा हल्लीं चोहोंकडे प्रसार झाला आहे तसा त्या वेळेस कांहीं नव्हता, ह्मणून घरीं राहूनच नानकानें ज्ञान संपादन केलें. याचे गृहशालावर्ती सहाध्यायी कोण कोण होते याचें कोठें वर्णन अथवा नामनिर्देशही आढळत नाहीं. त्यानें पर्शियन् भाषेचें अध्ययन लवकर केलें. हिशोबठिशोब करण्याच्या कामांत तो थोड्या काळानें कुशल झाला. यापेक्षां त्याची विद्यासामग्री जास्त नव्हती. त्याचें बापाशीं चांगलें जमत नसे. कारण

बापाचा स्वभाव जरा कडक होता. एके दिवशीं तो गु
चारावयास घेऊन गेला होता तेव्हां त्यास निद्रा आली
इतक्यांत गुरांनीं आसपासच्या शेतांत जाऊन धान्याचे
फार नासाडी केली, तेव्हां काळू संतापून नानकास पुष्क
बोलला. परंतु त्यानें शांतपणें ऐकून घेतलें. एके दिवश
रानांत निजला असतां त्याच्या अंगावर सूर्यकिर
पडलीं होतीं, तेव्हां एका नागानें आपली फडा सूर्या
च्या आड धरून उन्हाचें निवारण केलें. हें वृत्त ज्य
ठिकाणीं घडलें त्यास "कियर साहेब" असें ह्मणतात
येथें एक सुरेख इमारत बांधली आहे. संसारसुख केवळ
स्वप्नवत् आणि क्षणिक आहे असें समजून त्याविषयीं
तो फार औदासिन्य दर्शवी. "गर्भश्रीमंती, तारुण्याची
भरज्वानी, अनुपम सौंदर्य व अलौकिक सामर्थ्य" यां
पैकीं एकही असलें तरी तें सर्व अविचाराचें व अनर्थाचे
मूळ आहे, मग त्या सर्वांची एके ठिकाणीं गांठ पड
त्यावर काय पुसावें! या विषयारण्यामध्यें भरज्वानींत
आलेल्या पुरुषांचीं इंद्रियरूप हरिणें मृगजलरूप विला
सोपभोगांचे अमर्याद कामनेनें मोहित होऊन इतस्तत

---

१ **होळकर** वंशाचा मूळपुरुष जो **मल्हारराव होळकर**
त्याच्याविषयींही अशीच गोष्ट पुस्तकांतून लिहिली आहे. ती
अशी कीं:—मल्हारी भरदोन प्रहरीं, आपल्या मेंढयांस चारा
यास लावून, आपण उन्हांत स्वस्थ पडला असतां त्यास झोंप
लागली. त्या वेळीं त्यास सूर्यकिरणांचा ताप लागूं नये ह्मणून
त्याच्या मस्तकावर एका मोठया नागानें आपली फडा धरिली
महत्पद प्राप्त होण्याचें हें सूचक चिन्ह आहे, असें कितीएक
लोक समजत असत.

भटकत फिरतात. क्षत्रियकुलामध्यें जन्म झालें ह्मणून आपले हातून वाईट वर्तन होणार नाहीं असा नेम नाहीं. सद्गुरूपासून ज्यास शिक्षण मिळालें तो शिष्य सन्मार्गाचरण करीलच करील असा भरंवसा नाहीं. केंव्हां केंव्हां सदुपदेशकाचा सर्व उपदेश ' उपड्या घागरीवर पाणी ' घातल्याप्रमाणें व्यर्थ जातो. " संसाररूप विषवृक्षाचें सेवन करून ह्या नरदेहाची माती करून टाकणें हें महापाप आहे. संसारांत राहून व्यापारधंदा करून काय करावयाचें आहे? " असे अनेक विचार नानकाचे मनांत वारंवार येत. परंतु ते सर्व विचार आपले बापाच्या मर्जीस्तव तो एकीकडे ठेवी. नगराबाहेर सुमारें अर्ध कोसावर क्षिप्रानदीचे कांठीं विद्यामंदिर बांधून तेथें **चंद्रापीड** व **वैशंपायन** यांस आचार्यांच्या स्वाधीन करून थोडकेच वेळांत ते दोघे सर्व शास्त्रें व सर्व कला शिकल्यावर त्यांस राजमंदिरीं आणिलें त्या समयीं **शुकनासा**नें जो चंद्रापीडास उपदेश केला आहे तो जणुंकाय **नानक** याचे मनांत पक्का बिंबला होता. विशेषेंकरून इंद्रियसुख आणि लक्ष्मीमदांधता ह्याविषयीं शुकनासाचे विचार नानकाचे अंतःकरतांत पूर्णपणें भरले होते विषयसुखविषाचे रुचीनें ज्याचें मन भुलून गुंग झालें नाहीं, असा पुरुष या जगांत विरळा. " आपणास धन कशास पाहिजे? त्याचा काय उपयोग? लक्ष्मीचे पाठीस लागून हजारों पुरुष आपल्या जीवाची माती करून घेतात. ती सर्वांसच कसपटाप्रमाणें मानिते, व पाहतां पाहतां विद्युल्लतेप्रमाणें नाहींशी होते. हिचा कोण्याही शाहण्या मनुष्यानें भरंवसा धरूं नये. ही आज एकास ऐश्वर्याच्या

शिखरास चढविते व दुसरे दिवशीं त्यासच धुळीस मिळवून त्याची दुर्दशा करून टाकिते. चांगल्या लोकांच्या वाऱ्यासही ही उभी राहत नाहीं. सरस्वतीनें ज्यास आपलेंसें ह्मणून वर दिला आहे त्यांचा ही अपरिमित मात्सर्यानें द्वेष करिते. गुणवान् पुरुषाजवळ ही क्षणभर सुद्धां ठरत नाहीं. त्याजपासून समजून उमजून दुरून जाते. कुलीन पुरुषांचें दर्शन हें तिला अमंगल व अपशकुनवत् भासतें." अशा प्रकारची दुष्ट, नष्ट, खष्ट, पापी, दुराचारी, घातकी, मत्सरी संपत्ति मिळवून कांहीं सार्थकता नाहीं असें त्याचे मनांत पक्कें ठसलें होतें. विषयविलासासक्तीचे संबंधानें पाहिलें तर बौद्धधर्मप्रवर्तक बुधासारखी याची स्थिति झाली होती. त्यास संसारामध्यें अगदीं चैन पडेना. इंद्रियसुखाचे अमित सेवनानें सोलापूरकर रामजोशीवावाचे हृदयांत विलासाची चिळस बसून जशी विरक्ति उत्पन्न झाली होती अशी कथा आहे, त्याप्रमाणेंच नानक याची अवस्था झाली होती. नानकास विषयवासना विषवत् वाटून त्यानें सर्वसंगपरित्याग केला होता. तो आपला सर्व वेळ ईश्वरविषयक विचारांत नित्य क्रमानें घालवितो हें त्याचे बापास आवडेना. त्यास निदिध्यास करण्याची संवय लागली आहे हें चांगलें नव्हे. हा छांदिष्टपणा एकदां कसा घालवितां येईल असें त्यास झालें होतें. त्याची ही खोड जावी व त्याणें संसार करून चारचौघांप्रमाणें सुखरूप रहावें ह्मणून त्याचे बापानें त्याजवळ ४० रुपये दिले व त्यांचा तूं व्यापार कर ह्मणून सांगितलें. ह्या पैशाचें एक ठिकाणीं मीठ खरेदी करून दुसरे ठिकाणीं वीक व त्या व्यापारामध्यें

किती फायदा होतो तो मला दाखीव. या कृत्याचा हेतु ह्मणून हाच कीं, नानकास व्यापाराची गोडी लागावी व तेणेंकरून त्यानें आपल्या ईश्वरपरायणतेचा त्याग करावा. नानकास प्रवासास जाण्याची फार हौस असे. तशांत आज बापाची परवानगी मिळाली ह्मणून तर त्यास फारच आनंद झाला. "साखरेचा खाणार त्याला देव देणारा" अशी स्थिति त्याची झाली. जी गोष्ट आपणास मनापासून आवडत होती ती दैवयोगें प्राप्त झाली ह्मणजे हर्ष होणें हें साहजिक आहे. ज्या गांवीं मीठ खरेदी करण्यास्तव जावयाचें होतें त्या गांवीं आपल्याबरोबर सिंधु जातीचा बाळा नामक एक जाट बरोबर घेऊन तो गेला. सुदैवानें मार्गामध्यें कांहीं फकीरलोकांची गांठ पडली. त्यांजपाशीं संभाषण करावें अशी नानकास इच्छा उत्पन्न झाली. परंतु ते फकीर प्रवासाचे श्रमानें अगदीं थकून म्लान झाले होते; त्यांस पुरतें 'होय नाहीं' ह्मणण्याची सुद्धां शक्ति राहिली नव्हती. तेव्हां नानकाचे प्रश्नांचीं उत्तरें त्यांस देववतना. ते फक्त माना डोलवून आपला रुकार प्रदर्शित करीत. पुन्हा त्यांस तीन दिवसपर्यंत खाण्यास अन्न मिळालें नव्हतें, ह्मणून उपासमार काढावा लागला. त्यांचे दीनवाण्या स्थितींचा कळवळा येऊन सद्गदितांतःकरण होत्साता नानक ह्मणाला, "माझ्या बापानें मिठाचा व्यापार कर ह्मणून मला सांगितलें आहे, पण व्यापारांत होणारें सुख क्षणिक होय, चिरकालिक नव्हे.

माझी अशी इच्छा आहे कीं, हें धन त्या फकिरां
देऊन त्यांस सुखी करावें. त्यात शाश्वत चिरस्था
आणि अक्षय्य सुख मला प्राप्त होईल." त्याच्या बरोब
असणाऱ्या सोबत्यानें उत्तर दिलें:—"महाराज, आपल
निश्चय वास्तविक शहाणपणाचा आहे, तो तुम्ही तडीस

---

१ नानक हा सधन होता असें भगवद्भक्तचरित्रकार जो महिपति यानें 'भक्तलीलामृतां' त वर्णिलें आहे. 'अर्थमनर्थं भावय नित्यम्' या महाजनोपदेशाचें खरें स्वरूप नानकाच्या हृदयपटावर चांगलें उमटलें होतें असें पुढच्या उताऱ्यावरून स्पष्ट दिसतें—

द्रव्यापाशीं अति अनर्थ । द्रव्यापाशीं प्राणघात ॥
द्रव्य मिळतांचि विरक्त । तरी विषयासक्त तो होय ॥ ११ ॥
द्रव्यआशा धरिली जरी । तरी सख्खे बंधु होती वैरी ॥
द्रव्यें मित्र होतसे दुरी । विकल्प अन्तरीं शिरतसे ॥ १२ ॥
द्रव्यापाशीं होतसे कुबुद्धि । द्रव्यें भ्रंशे साधकाची बुद्धी ॥
द्रव्यासि चोर जपती आधीं । प्राणांत संधीतें करिती ॥ १३ ॥
द्रव्यासि परचक्राचें भय । द्रव्यवानासि राजा नागवितांहे ॥
द्रव्यवान संसारिक आहे । तरी दरवडा ये तयावरी ॥ १४ ॥
द्रव्यआशा धरितां मनें । तरी विरक्तासि निन्दिती जन ॥
द्रव्यप्रतिग्रह घेतांचि जाण । तरी पदरींचें पुण्य तें वेंचे ॥ १५ ॥
+ + + + ॥ १६ ॥
द्रव्यवानासि चित्तीं तळमळ । द्रव्य जतन व्हावयाची हळहळ ।
द्रव्यवान अतृप्त सर्व काळ विघ्नदायक सबळ द्रव्याचि कीं ॥ १७ ॥

**भक्तलीलामृत**—अध्याय १

आपल्या द्रव्याचा व्यय उत्तम प्रकारें करावा या इच्छे नानकानें प्रथम देवालयें बांधलीं, नंतर तीं मोडून टाकून मशी बांधल्या. 'मग देउळें मशीदी मोडून । बहुत बांधिले सेतख ने ॥' अशी चमत्कारिक गोष्ट महिपतीनें सांगितली आ

नेण्यास विलंब लावूं नये." हे विचाराचे शब्द बाळाचे मुखांतून बाहेर पडतांच नानकास मोठा हर्ष झाला, व त्यानें मोठ्या संतोषानें सर्व पैसा त्या क्षुधाक्रांत फकीरांस वांटून दिला. फकीर असो कीं महाफकीर असो, अन्न-सेवनाव्यतिरिक्त प्राणधारण होणें नाहीं. "अन्नमय प्राण" आहे तेव्हां एक एकाविना व्यवहारदृष्ट्या राहतां कठीण

---

नानकाप्रमाणेंच **तुकारामा**सही धनलोभ नव्हता. त्यानें आपले अभंगांत हा भाव अनेक ठिकाणीं दर्शविला आहेः—

द्रव्याचा तो आम्हीं धरितों विटाळ ।
तयापाठीं काळ लाग करी ॥ १ ॥
करोनियां हेंची राहिलों जीवन ।
एक नारायण नाम ऐसें ॥ २ ॥
**तुका** म्हणे हेंची करुनि जतन ।
आलियाही दान याचकासी ॥ ३ ॥

तुकारामाची निस्पृहता ऐकून मराठी राज्याचे संस्थापक शिवाजी महाराज त्याच्या दर्शनास जावयाकरितां निघाले. बरोबर प्रमुख प्रमुख लोक व नजराण्याकरितां पुष्कळ जड-जवाहीर, सुवर्णमुद्रा वगैरे घेतलें. नंतर **लोहगांवीं** दर्शनाच्या वेळीं जवाहिरानें भरलेलें तबक तुकाराम महाराजापुढें ठेविलें.तें राजद्रव्यपाहून तुकारामास वाईट वाटलें आणि असें सांगितलें कीं, " तिन्ही त्रिभुवनीं आम्हीं वैभवाचे धनी " आहों. आम्हांस भगवद्भक्तीपेक्षां दुसरा कोणताही नजराणा प्रिय नाहीं. धन हें गोमांसाप्रमाणें वर्ज्य आहे. याप्रमाणें मजकूर महीपतीनें लिहिला आहे. तुकारामाची निर्लोभता आणि निष्काम वृत्ति पहून अचंबा वाटला व नजराण्याकरितां आणिलेलें सर्व द्रव्य महाराजांनीं जागच्या जागीं ब्राह्मणांस वांटून टाकिलें. निर्लोभता हें एक साधुत्वाचें लक्षण होय.

दिसतें. गरीब असो किंवा गर्भश्रीमंत असो, वेदांती असो कीं धादांती असो, सेश्वरवादी असो किंवा निरीश्वरवादी असो, मोठापाखण्डमती असो अथवा धर्मनिष्ठ असो, तथापि त्यास पोटजाळ चुकला आहे असें नाहीं. खरेंच; "आधीं पोटोबा मग विठोबा." अवचित प्रसंगीं अन्नसामग्री मिळण्याचें साधन, पैसा, आपणांस मिळाला ह्मणून त्या फकीरांस फार समाधान वाटलें. परंतु त्या फकीरांनीं द्रव्यग्रहण करण्याचें नाकारिलें; कारण त्यांस पैसा पाहिजे होता असें नाहीं. त्यांना अन्नाची गरज होती ती पैसा घेऊन दूर होत नव्हती. तेव्हां नानकानें जवळच्या गांवांत जाऊन आटा डाळ वगैरे जिन्नस खरेदी केले. आणि ते आणून त्या फकीर मंडळीस जेवायास घातलें. नानक हा आपल्यासारखा उदारबुद्धि पुरुष आहे असें त्यांचें मन त्यांस सांगूं लागलें. "आपल्यावरून जग ओळखावें" असा साधुमार्गच आहे. "सतां हि संदेहपदेषु वस्तुष प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः" हें सत्य आहे. नानक हा कोणी महान पुरुष असावा असा त्यांचा मानेग्रह झाला. एवढ्या लहानशा कृत्यावरून त्याची खात्री पटली कीं, हा पूज्य, व स्तुत्य मनुष्य आहे. साधुजनाचा स्वभाव ओळखण्यास इतर साधारण जनांस सुद्धां अवधि लागत नाहीं, तर साधूंस कोठून लागणार? "एका शितावरून भाताची परीक्षा होते" असें जें ह्मणतात तें ह्या स्थलीं समर्पक आहे. नानकाचे एका कृतीवरून फकिरांनीं केलेली परीक्षा खरी होय. तो तसाच साधुजनवृंदांमध्यें शोभण्याजोगा होता. असो. फकीरांचें भोजन झाल्यानंतर

" ईश्वर एक आहे, " " एकमेवास्मि नास्त्यस्मात्पर-मद्वितीयं वा " या गहन व नितांतदुर्गम विषयावर संभाषण सुरू झालें. या संभाषणानें त्याचें मन सुप्रकाशित झालें. ईश्वरानें कृपाळू होऊन आपणावर हा महाप्रसादच केला असें त्यास झालें. दुसरे दिवशीं नानक आपल्या बापाकडे घरीं परत गेला. तेव्हां तो एका वृक्षाच्या फांद्यांखालीं आच्छादित असा पडलेला त्याच्या बापास आढळला. तेव्हां काळूनें विचारिलें:—" नान्या, नफा कसा काय झाला तो सांग. " नानक ह्मणाला:—" बाबा, मला जो नफा झाला आहे तो जरी सांगतां येणार नाहीं तरी जन्मभर व्यापार केल्यानें देखील तसा प्राप्त होणें नाहीं. तुह्मीं मला चांगलें काम कर ह्मणून सांगितलें होतें त्याप्रमाणें स्वधर्म वरून स्वर्गामध्यें उत्तम धनसाधन करून ठेविलें आहे." इतकें सांगून झालेलें इतिवृत्त बापास कळविलें. हें मुलाचें उत्तर ऐकून त्या धनलोभी बापास क्रोध आला. त्यानें नानकास शिव्या देऊन त्याची यथास्थित पूजा केली. इतकेंच करून तो थांबला नाहीं. रागाच्या हिरिरिसरसा तो नानकास मारायास धांवला. आपण सांगितलेलें काम मुलानें लक्ष्य लावून केलें नाहीं, ह्मणून तो त्यावर चौदाव्या रत्नाचा

---

१ साधुसंतांचीं चरित्रें पाहिलीं तर असें एक प्रमेय निघतें कीं, त्यांचा यथेच्छ छळ त्यांच्या घरांतील मनुष्यांनीं करावा. कोणत्याही साधूचें चरित्र पाहिलें तरी त्यांत या गोष्टीविषयीं थोडाबहुत तरी उल्लेख यावयाचाच. नानकास ज्याप्रमाणें त्याच्या आईबापांनीं छळिलें त्याप्रमाणेंच **तुकारामा**चीही अवस्था झाली. तुकारामाची बायको त्यास संसारसंबंधानें वारंवार

प्रयोग करणार होता. हें अयोग्य वर्तन त्याचे बहिणीस आवडलें नाहीं. नानकीनें बापाच्या क्रोधशमनार्थ मध्य-

---

दुरुत्तरें बोले. भगवद्भक्तिविरहित त्याचा एक दिवसही जात नसे. याप्रमाणें अंगीं पूर्ण विरक्ति बाणली होती. त्याचें चित्त भगवद्भजनाकडे न लागावें ह्मणून त्याच्या बायकोनें व इष्टमित्रांनीं त्याची बहुत प्रकारें कानउघडणी केली व दुसरेही अनेक उपाय केले. परंतु त्याचा निश्चय काडीमात्र ढळला नाहीं. याप्रमाणेंच ग्रीस देशांतील प्रख्यात साधु, जो निस्पृहता, सहनशीलता आणि क्षमा ह्यांचा सागरच होता, त्याच्या वांटयासही अशीच गोष्ट आली. त्याची बायको झांटपी ही स्वभावानें पराकाष्ठेची तापट आणि द्वाड होती. तिनें **साक्रेटिसास** अतोनात त्रास देऊन त्याचें सत्व पाहिलें. ही चमत्कारिक गोष्ट 'गद्यरत्नावलीं' त थोडक्यांत सांगितली आहे ती अशीः—

"**साक्रेटिसास** एक बायको होती, तिचें नांव झांटपी. ती साक्षात् कृत्या असे. तिनें त्या बिचाऱ्याला एक दिवसही सुखाचा शब्द दिला नाहीं. तिनें त्यास ताप देण्याची पराकाष्ठा करून सोडिली. पण त्याची शांतता आणि सहनशीलता ह्या तिळभर देखील ढळल्या नाहींत. एके वेळीं अत्यंत क्रोधायमान होऊन त्याजवर तिनें अनिर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहिली. तेवढयानेंही तिच्या रागाची तलप न भागे. तेव्हां तिनें घाणेरडया पाण्याची घागर आणून त्याच्या डोक्यावर ओतिली. परंतु साक्रेटिसास तिचा राग आला काय? नाहीं, तिळभर देखील नाहीं! पाणी ओतल्यावर तो शांत मुद्रेनें आणि स्थिर चित्तानें ह्मणाला, "हां ठिक आहे! एवढी थोरली गर्जना झाल्यावर वृष्टि व्हावयाचीच!" ह्याला ह्मणावें अक्रोधवृत्ति! साक्रेटिसाचा अथेन्स येथील लोकांनींही विलक्षण छळ केला. सोनें तापविलें असतां तें जसें कसास चढतें त्याप्रमाणें थोरपुरुषांची परीक्षा छळ, त्रास व उपद्रव दिल्यानें उत्तम होते व त्यांचे खरे गुण उदय पावतात.

स्थपणा केला, परंतु सर्व यत्न निष्फळ झाले. त्याचा राग कांहीं केल्या शांत होईना. इंद्रियदमनास आणि कोपशमनास बरेंच शहाणपण लागतें, एरवीं होत नाहीं; असो.

'छडी वाजे झम्‌झम्‌ आणि विद्या येई घम्‌घम्‌' या वचनाचा प्रत्यय पाहण्याची संधि त्यास चांगली आली होती. परंतु त्या गांवचा मुसलमान जमीनदार रायभोलरभाट्टि यानें मध्यें पडून बापलेंकांचें जुंपलेलें भांडण सोडविलें. नानकाविषयीं कित्येक लोकोत्तर गोष्टी त्याच्या कानीं आल्या होत्या, व याचा स्वभाव साधा आणि निष्कपट असून त्यानें फकिरांस दानधर्म केला ही गोष्ट त्यास फारच आवडली. त्यानें काळूस ४० रुपये देऊन अशी सक्त ताकीद केली कीं, अतःपर नानकास कोणत्याही प्रकारें इजा करूं नये. ज्या ठिकाणीं नानकानें फकिरांस भोजन घातलें त्या जागेस "खरा सौदा" असें ह्मणतात. व ज्या वृक्षाच्या फांद्यांनीं त्यास आच्छादन केलें होतें, त्या जमिनीपर्यंत वाढल्या असून, त्या वृक्षास "मालसाहेब" असें ह्मणतात. नानकाच्या तरुणपणाच्या नानातऱ्हेच्या पुष्कळ गोष्टी पुस्तकांत लिहून ठेविल्या आहेत. त्या फार चमत्कारिक आहेत. त्यांतील आणखी एक येथें सांगतों:—शीक ग्रंथकारांचें असें मत आहे कीं, दैव त्यास अनुकूल असे. त्यास कोणत्याही गोष्टीची कधीं ददात नसे. तरुणपणीं शेतामध्यें तो गुरें चारण्याकरितां नेत असे. आपल्याकडे असें काम करणारास 'जांगळी' ह्मणतात. एके दिवशीं तो एका झाडाच्या छायेखालीं निद्रिस्त पडला होता. भगवान्‌ सूर्य-

नारायण अस्ताचलास चालला असतां सायंकाळीं त्याचे किरण नानकाचे मुखावर पडले तेव्हां एका कृष्णसर्पानें आपली प्रस्तृत फडा सूर्याचे किरण आणि नानक यांमध्यें उभी धरली. या समयीं रायभोलर नामक एक तालुकदार मार्गानें जात होता, त्यानें ही गोष्ट पाहून तो अगदीं चकित झाला. नानक कोणी महापुरुष आहे व त्याचा उदय खास होण्याचें हें निश्चयात्मक चिन्ह आहे अशी त्याचे मनाची खातरी झाली, व फकिरांस द्रव्य वांटून दिलें ह्मणून त्याचे बापानें नानकास मार दिला हें वर्तमान रायभोलर यानें ऐकिलें तेव्हां तो त्याचे घरीं गेला आणि काळूचे अयोग्य वर्तनाबद्दल त्याची निर्भर्त्सना करून 'पुन्हा नानकावर हात उगारल्यास संभाळ,' अशी सक्त ताकीद केली तोच हा मनुष्य. यानें सर्वां समक्ष पूज्यबुद्धीनें आणि विनयातिरेकानें नानकापुढें साष्टांग प्रणिपात घातला. ही सौजन्यदर्शक नम्रतेची कृति पाहून तेथच्या लोकांस आश्चर्य वाटलें. नानक हा अवतारी आणि भाग्यशाली पुरुष असावा असा लोक तर्क करूं लागले.

मातापितरांची प्रीति मुलांवर जी असत्ये ती निरपेक्ष असत्ये, ह्मणजे मुलांनीं आपण केलेल्या ममतेस्तव कांहीं उलट द्यावें, असें त्यांचे मनांत नसतें. तथापि त्यांनीं ज्ञानसंपादन करून प्रौढवयस्क झाल्यावर आपणास संसाराचें रहाटगाडगें चालविण्यास होईल तितकी मदत करावी असें वाटत असतें. परंतु ही गोष्ट सर्वांचे कपाळीं भोगण्याची नसते. विशेषतः ज्यांचीं मुलें लहानपणासूनच छांदिष्ट, हूड, आणि 'मनःपूतं समाचरेत्'

अशीं वागणारीं असतात, त्यांस मुलांपासून संसारकृत्यामध्यें कधींच साहाय्य मिळत नाहीं. काळूचे प्रारब्धीं नानकापासून संसारसुख भोगण्याचें नव्हतें असें दिसतें. सद्धर्ममार्गापासून नानकाचें मन वळून प्रापंचिक सुखाकडे लागावें ह्मणून काळूनें पुनः एकदा प्रयत्न केला. परंतु तो पूर्वीप्रमाणेंच व्यर्थ गेला. याविषयीं एक चमत्कारिक गोष्ट लिहिली आहे ती अशीः- नानकाचा मेहुणा जयराम हा दौलतखान लोदी याजकडे सुलतानपुर येथें चाकरीस राहिला होता, हें मागेंच सांगितलें आहे. या वेळीं हें शहर फार प्रसिद्ध होतें. कारण लाहोरावरून दिल्लीस येण्याच्या मार्गावरच हें असल्यामुळें येथें मुशाफरांची जाण्यायेण्याची रव असे. जयरामाकडे धान्याची देवघेव करण्याचें काम होतें. काळूनें नानकास असें सांगितलें कीं, 'तूं जयरामाबरोबर भागीनें व्यापार कर' ही बापाची आज्ञा मान्य करून नानक जयरामाकडे गेला, आणि जयरामाबरोबर व्यापार करूं लागला. सुलतानपुर येथें दौलतखान लोदी याचें धान्यगृह असे तेथें जयराम आणि नानक रहात. देवघेवीच्या कामामध्यें नानक जरी फार मेहनत करी, तथापि त्याचें मन ईश्वराकडे गुंतलेलें असे. त्याच्या ध्यानीं मनीं सच्चिदानंद परमात्म्याशिवाय दुसरें कांहींच नांदत नसे. एके दिवशीं सकाळीं बाह्येंद्रियांचे सर्व व्यापार बंद करून ब्रह्मांडीं प्राण नेऊन बसला असतां एक पवित्र मुसलमान फकीर तेथें आला आणि ह्मणालाः-
" हे नानका, तुझे विचार कोणीकडे गुंतले आहेत, हे सर्व व्यवसाय सोड आणि अक्षय्य सुखाचा व अक्षय्य धना-

चा लाभ जोडून घे." हे शब्द कानीं पडतांच नानक दचकून उठला आणि क्षणभर तटस्थ मुद्रेनें त्या फकिराचे तोंडाकडे पाहून पुनः विचारतंद्रीमध्यें गढून गेला. कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन त्यानें धान्यगृहांतील सर्व धान्य गरीब लोकांस वांटून दिलें. आणि शहराच्या वेशीबाहेर मोठा जयध्वनि करीत निघून आला. तेथें जवळच्या तळ्यामध्यें उडी टाकिली आणि तेथें तीन दिवस काढिले. या ठिकाणीं भविष्यकथनकर्ता इलियस् ज्यास मुसलमान लोक खीझर असें ह्मणतात, त्याची भेट झाली. याजपाशीं नानकानें सर्व विद्या आणि कला यांचें अध्ययन केलें. नानक यास फकिराचें दर्शन झालें ही गोष्ट शीक ग्रंथकारांनीं निरनिराळ्या रीतीनें लिहिली आहे. या काळाचे सुमारास तो संसार सोडून फकीर झाला, असें सर्व शीक ग्रंथकाराचें मत आहे. सत्समागमप्रोत्साहित होऊन ऐहिक सुखविरक्तीनें सर्वसंगपरित्याग करून नानक तळ्यामध्यें भविष्यवादक पैगंबराजवळ संभाषण करीत असतां दौलतखान लोदीनें जयरामास पकडून बंदिखान्यांत टाकिलें. सुलतानपुर येथील धान्यसंग्रहाची अफरातफर करून जयरामानें अवदानें मारिलीं, असा त्याजवर आरोप होता. परंतु त्या दीनवाण्या जयरामाचा काडीभर सुद्धां अपराध नव्हता. त्यास आपल्यावर हा भयंकर कहर कोठून कोसळला असें झालें. पहिल्यानें धान्याची उधळपट्टी कोणीं केली हें त्यास माहीत नव्हतें, आणि दुसरें, ही झाली असावी कशी ह्याची त्यास कल्पनासुद्धां करतां येईना. नानकानें कांहीं केलें ह्मणावें तर तो आपला मेहुणा, आणि स्वतांस

तर ह्या गोष्टीची अणुरेणुएवढी देखील माहिती नाहीं. ‘ एकीकडे आड आणि एकीकडे विहीर ’ अशी त्याची अवस्था झाली. त्यास अडकित्यांत सांपडल्यासारखें झालें. ह्या पंचाइतींतून एकदां आपलें अंग बाहेर काढून घेण्याचा त्यास उपाय सुचेना. अपराध केल्याशिवाय कचाटांत सांपडल्यास शाहण्या पुरुषांची मति गुंग होऊन जाते, मग इतर साधारण मनुष्यांची काय कथा ? पण गरीबांचा संकटसमयीं साहाय्यकर्ता ईश्वर आहेच. त्यानें नानकास परत येण्याची बुद्धि दिली. नानक परत आला आणि प्रथम “ जयराम निरपराधी आहे ” ह्मणून दौलतखान लोदीस कळविलें. सर्व अपराध माझा आहे. आपलें जें नुकसान वाजवी हिशोब केल्यानंतर ठरेल तें मी भरून देण्यास राजी आहें. गरीब जयरामास शिक्षा न करितां मला करावी, ” अशी त्यानें खानसाहेबाची विनवणी केली. खानानें त्याचें ह्मणणें कबूल केलें. जमाखर्च तपासून पाहतां जयरामाचें खानाकडे उलट येणें निघालें. तेव्हां खानसाहेबानें पूर्ववत् त्यास चाकरीस ठेवून त्याजवर कृपादृष्टि केली. शीक ग्रंथकार असें म्हणतात कीं, ह्या आश्चर्यकारक कृत्यांनीं नानकाची कीर्ति चोहोंकडे फांकली. तपस्याचरण, योगाभ्यास, तपःसमाधि इत्यादि कडक व्रतांचें तो आचरण करूं लागला. या समयीं समाहितांतःकरणानें परमेश्वराची मानसपूजा करून तो कालक्षेप करीत असे. अशी ही यतिवृत्ति धारण करून तो जिकडे जिकडे फिरला तिकडे तिकडे त्यानें आपल्या कीर्तीचा झेंडा मिरविला. सुलतानपूर येथें ज्या झाडाखालीं तो बसत असे तें अद्याप जीवंत आहे.

त्यास 'बाबाकी बीर' असें ह्मणतात व ज्या ठिकाणीं तो स्नान करीत असे त्यास 'संतघाट' ह्मणण्याची प्रवृत्ति आहे. नानकाविषयीं लोकांमध्यें इतका पूज्यभाव आहे कीं, तो धान्याचा व्यापार करीत असतां जीं वजनें व मापें बाळगीत असे तीं अद्याप त्याचे भक्तवर्यांनीं जपून ठेविलीं आहेत. त्याच्या दुकानास 'हटसाहेब' असें त्याच्या भक्तांनीं नांव दिलें आहे.

मुशाफरी केली असतां सर्व गोष्टी डोळ्यांनीं स्वतः पहावयास सांपडतात, व खऱ्याखोट्याचा निर्णय करितां येतो ह्मणून त्यानें हिंदुलोकांचीं प्रख्यात पवित्र स्थानें तीर्थें आणि यात्रास्थळें पाहिलीं. कितीएक ठिकाणीं त्यानें अद्भुत चमत्कार करून दाखविले अशी लोकवार्ता आहे. ब्राह्मणांबरोबर नानक धर्मसंबंधी विषयावर वाद करीत असे. श्रद्धा नसली किंवा मन पवित्र नसलें ह्मणजे कोणताही संस्कार केला अथवा देवतार्चन केलें, तरी तें सर्व व्यर्थ जातें, असे तो सांगे. हरिद्वारे येथें गंगेच्या कांठीं

---

१ **हरिद्वार** येथें **नानक** व **मर्दाना** हे आले होते. तेथें झालेल्या याच्या अद्भुत चमत्काराचें वर्णन **महिपतीनें** केलें आहे तें असें:—

तों योगीयांचा मुकुटमणी । विष्णुअवतार बोलती जनीं ॥
तो **गोरक्षनाथ** तये क्षणीं । अकस्मात नयनीं देखिला ॥६३॥
नानक तयासी आदेश करीत। मग काय ह्मणतसे मत्स्येंद्रसुत॥
तुह्मी जनांत सिद्धाई दाखविली बहुत । आतां सांगतों
कार्यार्थ तो करा ॥ ६४ ॥
चार लक्ष यात्रा या अवसरीं । मिळाली असे हरिद्वारीं ॥
तितुकियांसी भोजन दे सत्वरीं। योगेश्वर तरी तूं साचा ॥६५॥
ऐकोनि गोरक्षाची मात । नानक तयासी अवश्य ह्मणत ॥

राहून आसपासच्या लोकांस तो असा उपदेश करी कीं मन शुद्ध नसून कोणी देवताराधना करण्याची केवढीही मोठी खटपट केली तरी ती अगदीं कामीं पडावयाची नाहीं. एका दिवशीं कांहीं ब्राह्मणलोक पूर्वाभिमुख उभे राहून तर्पण करीत होते, तेव्हां नानकानें पश्चिमेस तोंड करून त्यांचेसारखीच कृति केली. असें करण्याचें

---

पुढें जावोनि त्वरित । आमंत्रणें सकळांतें द्या तुह्मीं ॥ ६६ ॥
सामर्थ्य पहावयासी तेथ । हरिद्वारासि गोरक्ष जात ॥
तों नानकें कवतुक केलें अद्भुत । तें ऐका निजभक्त भाविकहो ६७
चार लक्ष यात्रा ते अवसरीं । मिळाली असे हरिद्वारीं ॥
नानक गुप्तरूपें जावोनी सत्वरी । तृप्ती करी सकळांची ॥६८॥
सर्व सिद्धि अनुकूळ असत । इच्छाभोजन सकळां देत ॥
तों मागोनि येवोनि गोरक्षनाथ। आमंत्रण देत तयांसीं ॥ ६९ ॥
लोक ह्मणती गोरक्षनाथा । नानक सिद्ध येवोनि आतां ॥
इच्छाभोजन दिधलें समस्तां । गेला मागुता तीर्थासी ॥ ७० ॥
ऐसी आईकताची मात । आश्चर्य करी मत्स्येंद्रसुत ॥
तों नानकही तेथें प्रकट होत । नमस्कार करित गोरक्षा ॥७१॥
परस्परीं भेटोनि प्रीतीं । गोरक्ष बहुत करी स्तुती ॥
ह्मणे तुज ऐसा सिद्ध मूर्ति । त्रिजगतीं दिसेना ॥ ७२ ॥

इच्छिलेला पदार्थ मिळवून देण्याचें सामर्थ्य हें महासाधुत्वाचें एक लक्षण होय अशी समजूत आमच्या लोकांत आहे. तीस अनुसरूनच वरील कथा चरित्रकारानें दिली आहे. सहनशीलता, दानशूरता, स्पष्टवक्तेपणा, परोपकार, परमेश्वरभक्ति, हीं ज्याप्रमाणें साधूंचीं लक्षणें आहेत व तीं त्यांच्या चरित्रांत जशीं प्रादुर्भूत झालीं आहेत त्याप्रमाणेंच नुक्ताच सांगितलेला गुणही महाजनचरित्रांत आढळतो. एका अर्थी हें परोपकारवृत्तीचें एक स्वरूप होय असें ह्मटलें तरी चालेल. याप्रमाणेंच तुकारामाविषयींही एक गोष्ट त्याच्या चरित्रांत आढळते. ती वाचकांनीं वाचून पहावी.

कारण काय ह्मणून विचारल्यावर तो ह्मणाला, " पश्चिमेस कीर्तिरपूर येथें माझीं शेतें आहेत त्यांस मी पाणी देत होतों." हें उत्तर ऐकून त्या ब्राह्मणांस राग आला, आणि ते धिःकारपूर्वक ह्मणाले, " नानका, तूं घातलेलें पाणी इतकें दूर कसें पोहोंचेल ? " तेव्हां त्यानें प्रत्युत्तर दिलें, " तुह्मीं केलेलें तर्पण स्वर्गामध्यें तुमच्या पूर्वजांस पोंचेल असें तुह्मांस कसें वाटतें ? " असें समर्पक उत्तर मिळाल्यावर ते निरुत्तर झाले आणि त्यांनीं नानकाची पुन्हा गोष्ट काढली नाहीं.

हिंदुस्थानाच्या बाहेर नानक कोठें कोठें गेला होता हें बरोबर समजत नाहीं. नानकास लिहितां वाचतां येत होतें हें पूर्वींच सांगितलें आहे. इतिहासप्रसिद्ध चीन देशांतील यात्रेकरू हुएनसंग यानें आपल्या मुशाफरीचा जसा वृत्तांत लिहून ठेविला, तसा नानकानें ठेवला असता तर फार उपयोग झाला असता. तो रोजनिशी बाळगीत नसे यामुळें त्याच्या देशप्रवासाचें खरें वृत्त समजत नाहीं. नानकाच्यापूर्वींच भाई मर्दाना हा मरण पावला. भाई बाळा यास लिहितां वाचतां येत नव्हतें, तथापि त्यानें मुखजबानीनें ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या भाविक लोकांनीं लिहून ठेविल्या. त्यांस भूगोलविद्येचें ज्ञान नसल्यामुळें त्यांनीं नानक ज्या ज्या स्थळीं गेला त्या त्या स्थळांचीं नांवें मात्र लिहून ठेविलीं आहेत. यापेक्षां त्याच्या हकीकतींत जास्त माहिती नाहीं. परंतु एवढें खरें कीं, तो ठिकठिकाणीं हिंडून सर्व मतींच्या लोकांशीं दळणवळण ठेवी, व धर्मसंबंधानें उपदेश करी. प्रवासानें त्याच्या

स्थितींत कांहीं अंतर झालें नाहीं. तो ज्या गरीब स्थितींत प्रवासास निघाला तसाच परत आला. त्यानें मक्केची यात्रा केली, हिंदुस्थानांत प्रवास करीत असतां त्यास पुष्कळ दुर्घट संकटें आलीं तीं सर्व त्यानें पार पाडिलीं. संसारत्याग करून फकिराचा वेष घेण्यापूर्वी नानकानें आपली बायको आणि मुलें यांस आपल्या सासऱ्याकडे धाडिलें. याची बहिण नानकी हिचा याजवर फार लोभ होता. ही नेहमीं याचा पक्ष धरून सदोदित त्यास साहाय्य करीत असे. मुशाफरीस निघण्याचेपूर्वी नानकानें तिचा निरोप घेतला; आणि नंतर देशाटनास आरंभ केला. मुशाफरीचे वेळीं याजबरोबर दोन मनुष्यें होतीं. एक त्याचा लहानपणचा सोबती बाळा, व दुसरा मर्दाना या नांवाचा गवई. हा वाद्यकलेमध्यें हुशार होता. ज्या वेळेस नानक समाधिस्थ असे त्या वेळेस हा आपली मुरली घेऊन वाजवीत असे. नानकाचें साहचर्य त्यानें आपखुषीनेंच पत्करिलें. भाई मर्दाना याचा स्वभाव फार विलक्षण होता. याची क्षुधा कधीं शांतच झाली नाहीं. हा कांहींसा खच्चाळ असल्यामुळें वारंवार कचाटांत सांपडे. तेव्हां यास सोडविण्याची पाळी नानकावरच येई. नेत्रसंमीलन करून परमेश्वराचे शुद्धांतःकरणानें ध्यान करीत असतां नानकाचे दिवसचे दिवस जात. आसपास काय चाललें याचें त्यास कांहीं भानही नसे. अशा समयीं मर्दाना हा उन्हानें, भुकेनें आणि तान्हेनें व्याकूळ होई आणि पुनः कुटुंबामध्यें परत जावें अशी त्यास इच्छा होई.

एके दिवशीं गुज़ारानवाला नांवाच्या प्रांतांत अमिनाबाद ह्मणून एक प्रख्यात शहर आहे तेथें नानक गेला. त्याच्या परिचयाचा **ललु ठाकूर** ह्मणून एक गृहस्थ होता. त्याच्या घरीं तो बिऱ्हाडास उतरला. ललु ठाकूर हा मोठा सद्गुणसंपन्न आणि प्रामाणिक होता असें त्यास माहित होतें. नानकास एके दिवशीं **वजीरमलक भागू** यानें आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें. हा गरीब लोकांवर जुलूम करीत असे व अन्यायानें पैसा उपटीत असे; या कारणानें नानकानें त्याजकडे जाण्याचें नाकारिलें. यावरून त्याचे मनाची वृत्ति कशी होती आणि तो कितपत पापभीरु आणि अन्यायद्वेष्टा होता हें स्पष्ट होतें. अमिनाबाद येथें नानकाच्या निद्रास्थानाची अद्यापिही प्रख्याति आहे, व त्यास 'रोरीसाहेब' असें ह्मणतात. याच वेळेस **बाबरानें** हिंदुस्थानावर हल्ला केला. बाबराच्या लोकांनीं एकाएकीं **अमिनाबाद** शहरावर छापा घालून लुटारूपणाची कमाल केली. या वेळेस इतकीं अंदाधुंदी होऊन गेली होती कीं, विजयी लोकांनीं नानक आणि त्याचे सोबती यांस ओझें वाहण्याकरितां पकडिलें. नानक निमूटपणें त्यांच्या हवालीं झाला. नंतर त्यास बादशहाच्या तंबूपाशीं नेलें, तेव्हां त्याजबरोबर त्याचा सोबती मर्दाना हाही होता. नानकाची भव्य मुखचर्या आणि वजनदार भाषण यांनीं बादशहा अगदीं चकित होऊन गेला. नंतर दोघांमध्यें बराच वेळपर्यंत संभाषण झालें. शेवटीं बादशहानें त्यास बंधमुक्त करण्यास हुकूम दिला. त्या वेळीं नानकानें असें सांगितलें कीं, "बादशहाच्या सा-

तव्या पिढीपर्यंत दिल्लीचें राज्य त्याच्या वंशजाकडे चालेल." हें भाकित पुढें खरोखर खरें ठरलें. बादशहाचें आणि नानकाचें भाषण चाललें असतां चाकरानें बादशहाकरितां भांग आणली. त्यास भांगेचा मोठा शोक होता. बादशहानें थोडीशी नानकास द्यावयाकरितां पुढें केली. तेव्हां तो ह्मणाला कीं, "कधीं तोटा न येणारी अशी जबरदस्त भांग माझ्याजवळ आहे. ती घेतली असतां तिजपासून होणारें कार्य क्षणिक नसून चिरकालिक असतें." या ह्मणण्याचा बादशहास बरोबर अर्थ समजला नाहीं. तेव्हां त्याच्या अर्थाचें परिस्फोटन करावें ह्मणून त्यास सुचविलें. तो ह्मणालाः—"ईश्वरध्यान करणें हीच एक प्रकारची भांग आहे; तिचें सेवन केलें असतां मनास कांहीं विलक्षण चमत्कार होतात, व ते अढळ राहतात." केव्हां केव्हां त्याचे नातेवाईक त्यास परत **तळवंडीस** येण्याची भीड घालीत तेव्हां तो असें उत्तर देई कीं, "मला आईबाप, बंधु, कुटुंब यांपैकीं कांहीं नाहीं. माझा सर्व भरंवसा ईश्वरावर आहे. ईश्वरच काय तो माझा मायबाप, बंधु, सखा, सोयरा."

देशपर्यटन करण्यास निघाल्यावर नानक आपल्या आईबापांस आणि इष्टमित्रांस भेटण्याकरितां तळवंडी येथें आला. नंतर कांहीं दिवस लोटल्यावर त्याचा बाप आणि आई हीं मरण पावलीं. त्याचा पोशिंदा **रायभोलर** याची त्यानें एकदोनदां गांठ घेतली. प्रवास पुरा होऊन परत आल्यावर तो **रावी** नदीच्या तीरीं **कीर्तरपूर** येथें घर बांधून राहिला. येथें याचे शिष्य

किता एकसारखा सर्वांनीं उचलिला आहे. रेव्हरंड डॉक्टर साहेब, बाबू साहेब, ब्राह्मधर्माचार्यवर, श्रीमत्प-रमहंसपरिव्राजकाचार्य, कोणीही ह्मणा, सर्व एका माळेचे मणि. परंतु नानकाची आपला धर्मविस्तार करण्याची पद्धति अगदीं भिन्न होती. त्यास या धर्मावर तोंड टाक, त्या धर्मावर दांतओंठ चाव, या धर्माचीं व्यंगें मत्सरबुद्धीनें बाहेर काढ, त्या धर्माचा विनाकारण उप-हास कर, असें सुखें तोंडसुख घेणें बिलकुल आवडत नसे. "देव एक आहे" हें मत तो मोठ्या चातुर्यानें स्थापित असे.

देशपर्यटन करीत असतां नानक याची बाबर बाद-शहाशीं ओळख झाली हें पूर्वींच सांगितलें आहे. बादशहापुढें नानकानें आपलें धर्ममत दृढ निश्चयानें आणि वाक्चातुर्यानें स्थापित केलें. बाबर खुष झाला व त्यानें नानकास वर्षासन देण्याचा हुकूम केला. नानकानें ह्या देणगीचा स्वीकार केला नाहीं. कारण "सर्व प्राणिमात्रांचा उत्पन्नकर्ता तोच माझा संरक्षणकर्ता. त्यास माझी काळजी आहे. तेव्हां मला अशा देणग्या घेण्याची जरुरी नाहीं." असें कडकडीत उत्तर बादशहास त्यानें दिलें. स्वभावानें धीट,

---

१ नानकानें नवीन पंथ स्थापन केला. तेव्हां त्या वेळच्या बादशहास ( बाबर? ) ही गोष्ट आवडली नाहीं. त्यानें असें सांगून पाठविलें कीं, जो ज्याचा धर्म असेल त्याप्रमाणें त्यानें वागावें. दुसरा धर्म चांगला दिसला तरी त्याचा स्वीकार करूं नये. हें बोलणें नानकास आवडलें नाहीं. तेव्हां त्यानें यवनराजास उत्तर पाठविलें. तें उत्तर

दुसऱ्यावर अवलंबून न राहणारे आणि ऐहिक सुखाविषयीं विरक्त झालेले असे गृहस्थ, राजा म्हणजे काय पदार्थ आहे, त्यास कसपटाची सुद्धां योग्यता नाहीं असें मानितात, व त्यांनीं असें मानावें हें त्यांस योग्यच होय. इतरांनीं असें मानून चालणार नाहीं ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. " ईश्वर एक आहे " आणि त्याजवर विश्वास ठेवावा असें त्याचें मत होतें. धर्मभेद आणि जातिभेद हा पंक्तिप्रपंच ईश्वराच्या घरीं नाहीं. परंतु हें मनुष्यकृत्य होय असें तो प्रतिपादन करी. एके दिवशीं नबाब दौलतखान निमाज पढण्याच्या वेळीं त्यास आपल्याबरोबर मशिदींत घेऊन गेला. जेव्हां सर्व

अर्थातच बादशहास खपलें नाहीं. मनामध्यें तर तो संतुष्ट झाला होता, परंतु बाहेरून क्रोधाचा मोठा आव त्यानें आणिला होता. नानकाचें सत्व पहाण्याकरितां त्यास धरून आणावें अशी त्यानें तजवीज केली. राजाची आज्ञा होतांच लष्करांतील लोक नानकास धरून आणावयाकरितां निघाले. ते येऊन नानकाचे मठास वेढा देत आहेत तोंच 'वैष्णवी मायेचें चिंतन करून ' नानकानें तेथच्या तेथें दहा सहस्र सैन्य निर्माण केलें; आणि बादशहाच्या सैन्याची त्रेधा उडवून दिली. कित्येकांस खूप मार दिला. हा लोकोत्तर चमत्कार पाहून बादशाही सैन्यानें पळ काढला. हें वर्तमान बादशहास कळतांच सिद्ध पुरुषाचा छळ केला म्हणून त्यास पश्चात्तप झाला. नंतर रुमालानें हात बांधून तो नानकाच्या मठास आला. तेथें त्यास सद्भावानें नमन केलें. तसेंच त्यानें आपला अपराधही कबूल केला आणि क्षमा करून अभय द्यावें, अशी त्याची प्रार्थना केली. ही गोष्ट 'भक्तलीलामृता 'त विस्तारानें सांगितली आहे. नानकानें राजास जें उत्तर धाडलें तें मात्र वाचून पाहाण्याजोगें आहे.

मुसलमान गुढगे टेंकून प्रार्थना करूं लागले तेव्हां हा मात्र एकटा उभा होता. हें पाहून नवाबास फार वाईट वाटलें व त्यानें असें करूं नये ह्मणून सामोपचारें सांगितलें. नानक रामशास्त्र्याप्रमाणेंच पराकाष्ठेचा निःस्पृह, जात्या धीट व निर्भिड होता. कोणाची मनधरणी करणें अथवा परदास्यावर अवलंबून राहणें, यांचा याच्यासारख्या अभिमानबुद्धिपुरुषांस मोठा तिरस्कार वाटतो. मानहानि करून घेऊन चरितार्थ चालविण्यापेक्षां स्वातंत्र्याधिदेवतेची आराधना करणें श्रेयस्कर होय असें मानून महात्मे पुरुष संतृप्त असतात. प्रसंग पडल्यास ते कोण्या मनुष्याची केव्हां शोभा करतील याचा नेम नसतो. आपले धर्मविषयक विचार छपवून बड्या लोकांची मनधरणी करणें त्यास परम दुःसह वाटतें. नानक कोणाची परवा करीत नसे. "निःस्पृहस्य तृणं जगत्" अशी ह्मणच आहे. तो ह्मणाला, "नबाबसाहेब, आपण प्रार्थना करित नव्हतां. कंदाहार येथील घोडा विकत घेण्याविषयीं आपल्या मनांत विचार घोळत होते." नबाब हा प्रामाणिक मनुष्य होता. सत्यप्रीति हा एक त्याच्यामध्यें प्रशंसनीय गुण होता. तेव्हां तो लागलाच शरमला, व त्यानें माफी मागून कबूल केलें कीं, माझें मन प्रार्थनेकडे पूर्णपणें नव्हतें. काजीस हें नानकाचें आचरण आवडलें नाहीं. त्यानें नानकास विचारिलें कीं, तुह्मीं प्रार्थना कां केली नाहीं? त्यानें उत्तर दिलें, "काजीसाहेब, आपणही प्रार्थना करीत नव्हतां. आपल्या मुलीच्या दुखण्याविषयीं विचार तुमचे मनांत चालले होते. तसेंच आपलें शिंगरूं विहिरींत पडलें होतें

त्याविषयीं तुह्मी विचार करीत होतां. " हे शब्द कानीं पडतांच काजीचें तोंड खाडकन उतरलें. आणि नानकानें सांगितलेली गोष्ट खरी आहे असें त्यानें कबूल केलें.

देशपर्यटन करून परत आल्यानंतर नानकानें फकिराचा वेष टाकून दिला, आणि साधीं वस्त्रें नेसून आपल्या शिष्यवर्गास धर्मोपदेश करण्याचा उद्योग आरंभिला. तो आपल्या धर्ममताचें प्रतिपादन करीत असतां अन्य धर्मांचा छळ करीत नसे, हें मागें सांगितलेंच आहे; तथापि कांहीं हट्टाग्रही हिंदुधर्माभिमान्यांनीं त्याचा छळ केला. परंतु त्यानें आपली शांत व गंभीर वृत्ति सोडली नाहीं. शांतता हें खऱ्या धर्माचें अथवा साधुत्वाचें लक्षण होय.

परदेश पाहण्याची नानकास फार आवड असे असें मागें सांगितलें आहेच. पुष्कळ लोकांबरोबर तो धर्मसंबंधी वादविवाद करी. तो प्रवास करीत करीत मुलतान येथें गेला. आणि तेथून रावी नदीच्या कांठीं कीर्तरपुर नामक शहर आहे तेथें आला. ह्या शहरीं अनेक चमत्कार दाखवून त्यानें स्वदेहविसर्जन केलें. कीर्तरपुर येथें नानकाचें एक थडगें आहे. कीर्तरपुर येथील धर्मशाळेंत नानकाचे प्रावर्णाचा एक लहानसा तुकडा स्मारक ह्मणून ठेविला आहे. तो यात्रेकरू लोकांस दाखवितात. नानक हा आपल्या वर्षाच्या ७० व्या वर्षी ह्मणजे इ० स० १५३९ ह्मणजे संवत् १५९६ मध्यें निवर्तला.

नानकाचे तत्त्वदर्शनाची हकीकत येणेंप्रमाणें आहे. यानें आपल्या देशबांधवांच्या तत्त्वदर्शनाचा स्वीकार

केला. ईश्वराजवळ आत्म्याचें संमीलन होणें यास तो निवृत्ति मानीत असे. परंतु हिची प्राप्ति आत्म्याचें देहांतर, स्वकर्मानुबंधानें दंड सोसण्यासाठीं जें होतें, त्याची समाप्ति झाली ह्मणजे आहे असें तो मानीत असे. भटकणाऱ्या पक्ष्याचे छायेप्रमाणें जीवित आहे असें तो ह्मणे. परंतु मनुष्याचा आत्मा कुंभाराच्या चक्राप्रमाणें आपल्या आंसावर एकसारखा चक्री घेतो; जो मनुष्य अंधकारामध्यें तेजःपुंज असतो व मायेनें जो मोहित होत नाहीं व प्रापंचिक मोहांत गुंतून आपणास बद्ध करीत नाहीं, पण उलटा अढळ राहून वर्तन करितो तोच सुख पावतो, असे त्याचे विचार असत. व्यासाप्रमाणें किंवा प्लेटोप्रमाणें हें सर्व जगत् पंचमहाभूतात्मक आहे, असें तो मानीत असे किंवा काय ह्याविषयीं काथाकूट करून केवळ मानसिक कल्पना लढविणें यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. मुसलमान लोकांचा भविष्यवादकर्ता पुरुष व हिंदुलोकांचे निरनिराळे अवतार हे खोटे आहेत, व ह्यांमध्यें थोथांड भरलें आहे व यांचे योगानें पापाची वृद्धि आणि दुष्कर्माचा प्रसार झाला असें तो कधींही समजत नसे. ईश्वरानें मानवजातीला सदुपदेश व धर्मव्याख्यान करण्याकरितां अशा अवतारी पुरुषांस प्रेरिलें असावें असें त्यास वाटे व इतके यत्न चालले असतांही पापाचा उच्छेद होत नाहीं हें पाहून तो फार शोक करी. जगाचें कल्याण करण्याकरितां वेळोवेळीं ईश्वर चमत्कारिक रीतीनें आपल्या प्रेषितांस पाठवून देतो असा कित्येक राष्ट्रांमध्यें साध्याभोळ्या लोकांचा भाव आहे तो नानक यास खरा वाटत असे, परंतु आपण कांहीं

ईश्वरी अंश आहों किंवा अवतारी पुरुष आहों असें तो कधींही प्रतिपादन करीत नसे. आपल्यास माहीत असलेल्या अनेक देशांतील भिन्न भिन्न धर्मानुसारी लोकांस पाप, कुवासना, दुष्टाचार, अधर्म इत्यादिकांपासून मुक्त करून त्यांस खरें ज्ञान व्हावें ह्मणून जे ईश्वरप्रेरित उपदेशक निर्माण झाले त्यांतीलच हा एक आहे असें लोक मानीत असत. त्याचा उपदेश सर्व ठिकाणीं आणि सर्व काळीं लागू पडण्याजोगा असे. जगभर सत्याचा प्रसार व्हावा व खरें ह्मणून जें काय आहे त्याचा लोकांस बोध व्हावा ह्मणून जगन्नियंत्यानें माझ्यासारख्या गरीब गुलामास पाठविलें आहे असें तो ह्मणत असे. ज्ञान, शहाणपण, भक्ति, भाव इत्यादिकांनीं ओतप्रोत भरलेले त्याचे ग्रंथ केवळ ईश्वराच्याच शब्दांनीं भरलेले आहेत अशी आख्यता आपल्या लेखांची तो कधींही मिरवीत नसे. माझ्या उपदेशाची सत्यता अथवा असत्यता शाबीत करण्याकरितां व लोकांचे मनाचा भाव बसण्याकरितां ईश्वर कांहीं चमत्कार करून दाखवील असें त्याचें ह्मणणें नव्हतें. " ईश्वराच्या शब्दांशिवाय दुसऱ्या कोणत्याही शस्त्रानें भांडूं नये; आपल्या मतांचें पावित्र्य हें एक धर्मोपदेशाचें साधन आहे, " असें तो ह्मणत असे. संसाराचा त्याग करणें अथवा वानप्रस्थाश्रम अंगीकारणें हें ईश्वराच्या न्यायानें पाहिलें असतां एकसारखेंच असून एकादा मोठा धार्मिक वानप्रस्थाश्रमी किंवा निःसीम गृहस्थाश्रमी हे सारखेच होत असा तो उपदेश करी. हिंदुलोकांची गाईविषयीं पूज्यबुद्धि, व मुसलमान लोकांचा डुकराविषयीं

तिरस्कारपूर्वक द्वेषभाव ह्या दोन्ही गोष्टींविषयीं तो मोठ्या शहाणपणानें आणि सामोपचारानें वर्तन ठेवी. त्याचा स्वभाव सरळ असल्या कारणानें व त्याचे मन भक्तीच्या संस्कारामुळें शांत झाल्यामुळें तो लोकांच्या वेड्यावांकड्या समजुतींविषयीं विचार करून वागत असे. अलीकडील धर्मसंस्थापकांप्रमाणें उतावीळ होऊन तो कोणतेंही काम करीत नसे. शांतता, धैर्य, दृढनिश्चय, योग्यायोग्य विचारांचें मनन करून त्यांपासून सत्य काढण्याची इच्छा, खरा धर्म कोणता, खरा ईश्वर कोणता, ह्याविषयीं स्थिर बुद्धीनें निवांत स्थलीं एकाग्रचित्तानें विचार करणें, परधर्मी लोकांचे धर्माचीं मूलतत्त्वें समजून घेऊन त्यांतील तारतम्य पाहणें इत्यादि खऱ्या साधुत्वाचीं लक्षणें नानकाचे अंगीं नांदत होतीं असें कित्येक सुज्ञ विचारी ग्रंथकारांचें मत दिसतें. त्यानें आणि संप्रदायसंबंधानें त्याच्या शिष्यांनीं एक धर्मपुस्तक रचिलें आहे. त्यांत शीक धर्माची सर्व व्यवस्था सांगितली आहे.

नानकानें हिंदुधर्माचा परित्याग केला नाहीं किंवा मुसलमानी धर्माचाही अंगीकार केला नाहीं. तथापि त्याच्या धर्मशाखेंत उभयधर्मानुसारी लोकांचा बराच भरणा झाला हें खरें. नानकाच्या प्रेताची कोणत्या प्रकारें व्यवस्था करावयाची याविषयीं शिष्यमंडळींत वाद पडला. हिंदूंचें ह्मणणें तें जाळावें असें होतें व मुसलमानांचें ह्मणणें तें पुरावें असें होतें. या विषयावर अद्वातद्वा भवति न भवति चालली असतां वादाचा निर्णय ह्मणून होईना. उभयप्रतिपक्षांचे एकमेकांवर कोटिक्रम चालले होते. होता होतां वाग्ताडन पुरें होऊन हातझोंबी होण्याचा

प्रसंग आला, इतक्यांत कफनाखालीं पाहतात तों प्रेत नाहीं! भांडणाच्या गर्दींत त्याच्या शिष्यांनीं तें नाहींसें केलें असें सांगतात. प्रेत नाहींसें होतांच भांडणाचें मूळ कारणच नाहींसें झालें तेव्हां उभयपक्षांकडील वाद खुंटला. नंतर कफनाचे दोन तुकडे होऊन एक हिंदूंनीं जाळला व दुसरा मुसलमानांनीं पुरला. याप्रमाणें भांडणाचा शेवट झाला.

नानकाचे मरणानंतर त्याचा पट्टशिष्य अंगदशहा हा शीक लोकांचा धर्मगुरु झाला. याचें मूळचें नांव " लेहन " होतें. नानकाचे मुलांची इच्छा अशी होती कीं, बापाचें स्थान आपल्यास प्राप्त व्हावें. परंतु ते नानकाचे आज्ञानुसार कधींच वागत नसत, ह्मणून नानकास हें त्यांचें आचरण आवडलें नाहीं. तथापि त्याच्या बायकोनें मुलांच्या वतीनें बोलणें काढिलें. तेव्हां मुलांची परीक्षा घेऊन हुकूम पाळण्याच्या कसोटीस ते उतरतात किंवा नाहीं हें पाहण्याचा त्यानें निश्चय केला. एके दिवशीं मांजरानें अर्धमेलेला उंदीर नानकाचे पायावर आणून टाकिला त्यास उचलावें, ह्मणून त्यानें मुलांस सांगितलें. तेव्हां ते भयानें मागें झाले, परंतु लेहनानें झटकन उंदिरास उचलून फेंकून दिलें. हें आज्ञांकितत्व पाहून नानकास बरें वाटलें. त्यानें लेहनास आशीर्वाद दिला, आणि ह्मणाला, " जो आपल्या गुरूची आज्ञा पाळितो तोच खरा पुत्र होय. " याप्रमाणें घडलेलें वर्तमान त्याच्या बायकोस कळलें. तेव्हां तिचें तोंड लागलेंच बंद झालें. याच्या शिष्यवर्गांत गुरुस्थानापन्न कोणीं व्हावें ह्मणून कुजबुज चालली होती;

तेव्हां खरा शिष्य कोण हें कसास लावून पाहण्याकरितां त्यानें पुढची शकल काढिली. एके दिवशीं रस्त्यानें जात असतां एक प्रेत दृष्टीस पडलें. तेव्हां नानक आपल्या शिष्यांस ह्मणाला, " जो माझा खरा शिष्य असेल तो हें प्रेत भक्षण करील. " तेव्हां भयानें गर्भगळित होऊन प्रेतास बोट लावण्याची छाती कोणास झाली नाहीं. इतक्यांत लेहनानें प्रेत खाण्याची तयारी केली. तों तें नाहींसें होऊन पक्कान्नांनीं भरलेलें ताट त्याच्या दृष्टीस पडलें. हा अद्भुत चमत्कार पाहून सर्व शिष्यांची लेहनाच्या सच्छिष्यत्वाविषयीं पुरी खात्री झाली. आणि त्यांच्या कुरकुरीस जागाच उरली नाहीं. सारांश, आपल्या जागीं चांगल्या मनुष्याची योजना व्हावी अशी नानकाची इच्छा होती हें स्पष्ट दिसतें.

नानकाचे आणि दुसरे धर्मसंस्थापकांचे धर्मसुधारणेंत फार फरक आहे. रामानंद, चैतन्य, गोरख, कबीर इत्यादि धर्मसुधारकांनीं भिन्न भिन्न मतें स्थापून देशामध्यें अनेक धर्मपंथ माजविले. परंतु नानक याचा क्रम निराळा होता असें दिसतें. हिंदुधर्माची व मुसलमानधर्माची त्यानें माहिती करून घेतली होती. तो असें ह्मणे कीं, " दोन्ही धर्मांत बरेंच गाळून टाकण्याजोगें आहे. " त्यानें वेदाध्ययन केलें होतें. तो असें ह्मणे कीं, "कुराण, पुराण, सर्व उलथें पालथें करून टाकिलें, परंतु एकांतही ईश्वर आढळला नाहीं. " ह्याविषयीं एक श्लोक आहे त्याचें तात्पर्य:-" अनेक धर्मशास्त्रें व पुस्तकें वाचिलीं, परंतु एक ईश्वर कोठें आढळला नाहीं. अनेक पुराणें आणि कुराणें वाचिलीं, परंतु त्या सनातन भगवानाचा

पत्ता कोठें लागत नाहीं. " अशा भावाचीं पुष्कळ वाक्यें नानकाच्या " आदिग्रंथां " त दृष्टीस पडतात. त्यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, " कुराण व वेद यांचे अध्ययनानें क्षणिक सुख प्राप्त होईल, परंतु सनातन सुखपद ईश्वरप्राप्तीविना मिळणें नाहीं. "

त्याचीं नीतिपर वचनें आणि उपदेशपर वाक्यें यांचा संग्रह त्याच्या अनुयायी लोकांनीं करून ठेविला आहे त्यास ते "आदिग्रंथ " असें ह्मणतात. गुरुगोविंदसिंगानें शंभर वर्षांनंतर जो धर्मग्रंथ केला आहे त्याच्या पूर्वींचा हा ग्रंथ आहे, असें दर्शविण्याकरितां यास " आदि " हें विशेषण लाविलें आहे. ह्या पुस्तकाची भाषा त्या वेळची पंजाबी आहे. ती फार जुनाट असल्यामुळें विद्यमानकाळीं समजण्यास कठीण पडते, ह्मणून तीस " गुरुमुखी " ह्मणजे गुरुमुखावांचून न समजणारी असें नांव आहे.

बाबा नानकाचीं चरित्रें त्याच्या देशबांधवांनीं आणि अनुयायी लोकांनीं लिहून ठेविलीं आहेत. तीं अद्भुत चमत्कारांनीं अगदीं भरलेलीं असल्यामुळें त्यांच्यापासून खरा वृत्तान्त काडीभरसुद्धां कळत नाहीं. असत्याची भेसळ ज्या ग्रंथांमध्यें असते, ते ग्रंथ इतिहाससंबन्धानें फार कमी योग्यतेचे होत हें सर्वांस महशूर आहे. नानकावर लोकांची भक्ति विशेष असावी असें अनेक उदाहरणांवरून ठरतें. तिकडील देवालयांच्या भिंतींवर नानक, बाळा, भाई मर्दाना यांच्या चित्रांची एकसारखी रांग काढतात यानें केलेले अमानुष चमत्कार दाखविणारीं चित्रें काढलेलीं असतात, तीं पाहून भाविक लोकांस

मोठा आनंद होतो व केंस पिकलेल्या म्हाताऱ्यासारखें नानकाचें चित्र पाहून त्याच्या आद्यधर्मसंस्थापकाची स्मृति होते.

शीकलोकांच्या धर्मसंस्थापकाचें चरित्र येथें समाप्त झालें. त्यांच्या साधुजनांस ' ब्रह्मांडीं प्राण नेणें ' या योगसाधनाची माहिती होती असें दिसतें. प्रतापशाली महाराज **रणजितसिंग** यांच्या दरबारीं घडलेली गोष्ट **रा० रा० विनायक कोंडदेव ओक** यांच्या ' हिंदुस्थानकथारसां ' त दाखल केली आहे ती येथें लिहितों:-

एके दिवशीं एक फकीर महाराजांच्या कचेरींत येऊन उघडपणें बोलला कीं, मला तुह्मी जमिनींत पाहिजे तितके दिवस पुरा, तरी मी मरावयाचा नाहीं; आणि खरें झालें तर मला बक्षीस द्या, नाहीं तर देऊं नका. हा मनुष्य वेडा असेल, असें समजून महाराजांनीं दुर्लक्ष्य केलें. परंतु तो फकीर वारंवार कचेरींत येऊन त्यास दुराग्रहाचा त्रास देऊं लागला. तेव्हां, हा काय ह्मणतो तें एकदां करून पहावें, असें रणजितसिंगानें आपल्या सेवकांस सांगितलें. त्यास दहा दिवस झाल्यावर, मी तयार आहें, असें त्या फकीरानें येऊन कळविलें. त्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली. राजासमक्ष तो एका पोत्यांत बसला. तें पोतें चारी बाजूंनीं बळकट शिवलें. नंतर तें एका मोठ्या लांकडी पेटींत घातलें. ती पेटी बंद केली. तिजवर खुद्द राजानें आपणासमक्ष मोहरा करविल्या. मग ती पेटी एकदम विटबंदी कमानींत खळग्यामध्यें बसविली, आणि वर माती लोटली. आणखी त्याजवर समाधीसारखें कांहीं बांधिलें. तें कोणी उकरील ह्मणून

तेथें रणजितसिंगानें सक्त पाहरा ठेविला इतकेंच नव्हे तर त्या जमिनीवर व थडग्यावर धान्यही पेरिलें, अशासाठीं कीं, तें कदाचित् कोणीं उकरल्यास लागलेंच समजावें. ह्या गोष्टीस चाळीस दिवस लोटल्यावर, सर्व लोकांसमक्ष महाराजांनीं तीं पेटी उकरून काढविली, आणि तींत पाहतात तों, तो बुवा प्रेत झालेला त्यांच्या दृष्टीस पडला. नंतर त्यानें पूर्वी सांगून ठेविल्याप्रमाणें, ऊन ऊन भाकऱ्या त्याच्या पायांस व डोक्यास बांधिल्या, आणि त्यास ऊन पाण्यानें स्नान घातलें. नंतर दोन तासांनीं त्यास जीव आल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं; आणि दुसरे दिवशीं तर तो चांगला सावध झाला. त्या चाळीस दिवसांत त्याचीं नखें व केंस हीं मुळींच वाढलीं नाहींत. पहिलीं होतीं तशीं होतीं, असें पुष्कळांच्या सांगण्यांत आहे. ही गोष्ट खरी किंवा खोटी याचा संशय वाटतो; तथापि ज्यापेक्षां इतके लोकांसमक्ष असें कृत्य घडलें ह्मणतात, तेव्हां त्याविषयीं ग्रंथकारांनीं तरी काय सांगावें ?

पृथ्वीच्या पाठीवर आजकालपर्यंत जे अनेक धर्मोपदेशक झाले त्यांच्या धूर्ततेविषयीं तत्तद्धर्मानुयायी लोक स्तुति करतात. नानकशहाच्या धूर्ततेविषयीं एक चमत्कारिक गोष्ट आहे; तीही उतरून घेऊन हाविषय पुरा करतों. " मागें पंजाब देशांत रोज जबरदस्तीनें मुसलमान लोक हिंदूंना बाटवूं लागले; त्या वेळेस नानकशहास फार काळजी पडली कीं, ' आतां करावें कसें ? ' याप्रमाणें एक दिवस विचार करीत बसला असतां त्याच्याजवळ एक दीर्घ चावट शिष्य होता, त्यानें झाडीवर चढून त्याच्या मस्तकावर लघुशंका केली. नानकशहा वर पहातो तों

आपला चावट शिष्य बसला आहे. त्यांना फार राग येऊन त्याला विचारलें. "अरे बेवकूब, ए क्या करता है?" त्यानें उत्तर दिलें, " गुरुमहाराज, आपका मुखसें ऐसा बचन निकला है कीं, सब दुनिया खुदाका मंदर है, और खुदा सब मंदरमें पूरा भरा पडा है, तो हमने नाडा किदर छोडना ? " हें उत्तर ऐकून नानकशहा हंसून त्यास बोलला, " तुमारी अक्कल हमारेसे बडी है. पन देखो बादशहा दररोज हिंदुलोककूं दुःख देता है, इसका कुच बंदोबस्त करो." तेव्हां त्यानें बरें ह्मणून सांगितलें. नंतर थोड्या दिवसांनीं दोन जोडे जरीच्या वेलबुट्टीचे भले मोठे चार हात लांब आणि दीड हात रुंदीचे बनविले. त्यांतून एक बादशहाच्या नमाज पढण्याच्या मशिदींत जाऊन ठेवून दिला व मोठ्या तीन हात उंचीच्या खुजामध्यें लघुशंका जमा करून तेंही त्याजवर ठेवून दिलें आणि आपण गांवाबाहेर रातोरात गुप्तपणें निघून गेला; पहांटेस रोजच्या प्रमाणें बादशहा येऊन पाहतो तों मोठा जोडा आणि एक पाण्याचा खुजा आणून ठेविला आहे. बादशहा मोठा भाविक होता; तो हा अल्लाचा जोडा आहे ह्मणून फार भक्तीनें चुंबन करूं लागला. थोडक्या वेळानें सर्व दरबारचे हजारों लोक जमून सर्वच त्या जोड्याचें चुंबन घेऊं लागले, व त्या खुजांतील घाणेरडें तीर्थ पिऊं लागले. बादशहा ह्मणूं लागला, "अल्ला, हमने कौनसा गुन्हा किया? हमारा नजरकुं क्यौ नै आया ? बहुत दिनसे अरज करता हूं. अल्ला, तेरेकुं मिठा पानी नहीं मिला ? दर्यावका पानी खुजेमे भरा पडा है! अल्ला, मेरे वास्ते कितनी आपकू तकलीफ हुई? और मेरा

कम नशीबसे नजर नहीं पडा !" याप्रमाणें मोठ्यानें रडूं लागला, व याचप्रमाणें इतर लोकही रडूं लागले. इकडे नानकशहाचा शिष्य भरबाजारामधून दुसरा जोडा एकाच पायांत घालून मोठ्यानें आरोळी ठोकीत येत आहे:— "अरे कुई जानता है, हमारा दूसरा जूता और नाडा छोडनेका खुजा किदर है ? हम् रातकुं मशीदके बाहिर सोयाथा, तब कोई चोर लेकर गया है." ही बातमी लगेच बादशहास कळतांच तोबा तोबा करून अं|कून थुंकून दाढीबिढी सगळी खूप धुवून टाकिली; आणि या लुच्चाला पकडून आणिलें. तों दुसरा जोडा त्याच मासल्याचा खराच त्याच्या पायांत आहे. तेव्हां बादशहाला अतिशय राग येऊन त्याच्या कपाळावरील टिक्का चावून काढून टाकायास हुकूम केला. कपाळावरील गंध चावून काढून टाकण्याचा पहिल्यापासून त्याचा हुकूम असे ह्मणून ही गोष्ट या सोद्यास पूर्वीच ठाऊक होती, तेव्हां हा नरकाचा टिक्का लावूनच आलेला होता. त्याचा त्या चावणारास जेव्हां घाणेरडा दर्प आला तेव्हां तो वाईट तोंड करून ओकूं लागला. त्या वेळेस सर्व लोकांस याची पूर्ण लुच्चेगिरी समजली. बादशहा याची विलक्षण मस्करी पाहून कांहीं अंशीं खुष होऊन ह्मणाला, " तूं या मस्करीबद्दल काय इनाम मागतोस? " तेव्हां त्यानें सांगितले कीं, " खाविंद, हिंदूकुं आजसे जबरदस्तीसे मुसलमान नहीं बनाना एच अरज, और दुसरा कुच नहीं. " त्या दिवसापासून त्याच्या राज्यांत हिंदुलोकांना जुलमानें बाटविणें बंद झालें असें सांगतात. याप्रमाणें भरतखंडवासी जे

जे धर्मोपदेशक होऊन गेले त्यांनीं आपल्या धूर्तपणाची कोटी एकमेकांवर केली आहे. परदेशस्थ धर्मोपदेशकांच्या धूर्तपणाविषयीं अशाच गमतीच्या गोष्टी आहेत, पण विषयान्तराच्या दोषास्तव त्याचा उल्लेख येथें करणें प्रशस्त नाहीं.

---

सन १८७७त रा. रा. वामन दाजी ओक यांणीं हा निबंध लिहून विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकांत छापविला. तेव्हांपासून त्याचें स्वतंत्र पुस्तक छापवून प्रसिद्ध केल्यास लोकांस याचा बराच उपयोग होईल असें कित्येक मित्रांच्या सूचनेवरून दिसून आलें. ह्मणून हल्लीं निबंधकार यांची सम्मत्ति घेऊन चरित्रवाचनेच्छूंस तो पुस्तकरूपानें सादर करीत आहों. या निबंधांतील शेवटच्या भाग लिहितांना 'इंदुप्रकाशांतून,' माहिती घेतल्याचें निबंधकार प्रांजलपणें कळवितात. तारीख १९ आगष्ट सन १८८९.

प्रकाशक.

---

# याच ग्रंथकारानें केलेलीं पुस्तकें.

लार्ड बेकन याचें चरित्र. किं० १० आणे. ट० खर्च १ आणा.

श्री. थोरले माधवराव पेशवे यांच्या मृत्यूवर कविता. किं. साहा आणे. ट० हां० एक आणा.

गणपतिनिधन विलाप ह्मणजे कैलासवासी गणेश वासुदेव जोशी यांच्या मृत्यूवर कविता. किं० दोन आणे. ट० हां० अर्धा आणा.

या तिन्ही पुस्तकांस दक्षिणा प्रैज कमिटीकडून बक्षीस मिळालें आहे, आणि नांवाजलेल्या वर्तमानपत्रांत यांविषयीं अनुकूल असेच अभिप्राय पडले आहेत. हीं पुस्तकें "विविधज्ञानविस्तार पुस्तकालया" मध्यें विकत मिळतील.